रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक २८७
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, ६ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

चिंचपाडा येथील मंदिरात चोरी करणारे आरोपी गजाआड/३
मोरबे धरण प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन स्थगित/५
डब्ल्यूटीसी फायनललाही के. एल. राहुल मुकणार/८

## 'डब्ल्यूएचओ'ने जागतिक आरोग्य आणीबाणी हटवली

**नवी दिल्ली** : मागील जवळपास साडेतीन वर्षांपासून जगभरात हाहाःकार माजवणाऱ्या कोरोनाची लाट संपली असल्याची घोषणा जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) केली आहे. यासोबतच कोविड-१९मुळे लागू करण्यात आलेली जागतिक आरोग्य आणीबाणी हटवण्यात आली आहे. 'डब्ल्यूएचओ'च्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात माहिती देताना डब्ल्यूएचओचे महासचिव डॉ. टेड्रोस यांनी म्हटले की, काल आपत्कालीन समितीची १५वी बैठक झाली. यामध्ये कोविड-१९ला जागतिक आरोग्य आणीबाणीच्या कक्षेबाहेर घोषित करावे, अशी शिफारस करण्यात आली. ही शिफारस समितीने स्वीकारली आहे. आरोग्य आणीबाणी मागे घेतली असली तरी कोरोनाचा जागतिक धोका अजूनही आहे, असे डब्ल्यूएचओने स्पष्ट केले आहे.

# खासदार शरद पवारांकडून राजीनामा मागे

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी कायम राहण्याचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा मागे घेतला आहे. मुंबईतील वाय. बी. चव्हाण प्रतिष्ठानमध्ये शुक्रवारी (दि. ५) पत्रकार परिषद घेऊन त्यांनी ही माहिती दिली.

राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा असलेल्या खासदार शरद पवार यांनी २ मे रोजी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होत असल्याची घोषणा केली होती. तेव्हापासून पक्षाचे नेते व कार्यकर्ते हा निर्णय त्यांनी मागे घ्यावा अशी विनंती करीत होते. आज सकाळीच राष्ट्रवादीच्या दिग्गज नेत्यांच्या समितीने पवारांचा राजीनामा एकमताने नामंजूर केला होता. त्यानंतर संध्याकाळी ५.३० वाजता पवारांनी पत्रकार परिषद घेऊन आपला राजीनामा अखेर मागे घेतला.

'लोक माझे सांगाती' या माझ्या आत्मचरित्रपर पुस्तकाच्या अनावरण समारंभावेळी मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय जाहीर केला होता. सार्वजनिक जीवनातील सुमारे ६३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर मी या जबाबदारीतून मुक्त व्हावे अशी माझी भूमिका होती, परंतु मी घेतलेल्या निर्णयाने जनमानसांमध्ये तीव्र भावना उमटली. मी निर्णयाचा फेरविचार करावा याकरिता माझे हितचिंतक, माझ्यावर प्रेम व विश्वास असणारे कार्यकर्ते,



चाहते यांनी संघटित होऊन एकमुखाने, काहींनी प्रत्यक्ष भेटून मला आवाहन केले. त्याचबरोबर देशभरातून व विशेषत: महाराष्ट्रातून विविध पक्षांचे सहकारी व कार्यकर्ते यांनी मी अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा घ्यावी अशी आग्रही विनंती केली, असे खासदार पवार यांनी सांगितले.

माझ्याकडून आपल्या भावनांचा अनादर होऊ शकत नाही. आपण दर्शवलेले प्रेम आणि विश्वास यामुळे मी भारावून गेलो आहे. माझ्या निर्णयापासून परावृत्त होण्यासाठी आपण सर्वांनी केलेली आवाहने व विनंत्या यांचा विचार करून तसेच पक्षाने गठीत केलेल्या समितीने मी पुन्हा अध्यक्षपदी राहावे या निर्णयाचादेखील मान राखून मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय मागे घेत आहे. मी पुनश्च: अध्यक्षपद स्वीकारत असलो तरी संघटनेत कोणतेही पद अथवा जबाबदारी सांभाळणारे उत्तराधिकारी निर्माण होणे आवश्यक असते, असे माझे स्पष्ट मत आहे. पुढील कार्यकाळात पक्षामध्ये संघटनात्मक बदल करणे, नव्या जबाबदाऱ्या सोपविणे, नवीन नेतृत्व निर्माण करणे यावर माझा भर असेल, असेही खासदार पवार यांनी म्हटले.

### अजित पवार अनुपस्थित

खासदार शरद पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा मागे घेत असल्याची घोषणा केली, त्या पत्रकार परिषदेस राष्ट्रवादीचे नेते अजित पवार गैरहजर होते. त्यामुळे पत्रकारांनी या मुद्द्यावरून प्रश्न विचारला असता, खासदार पवार म्हणाले की, पत्रकार परिषदेत सर्वजण उपस्थित नसतात. काही लोक येथे आले आहेत, काही गैरहजर आहेत. आज पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी एकमताने निर्णय घेऊन तो निर्णय मला कळवला. त्यामुळे येथे कोण आहे आणि कोण नाही असा प्रश्न उपस्थित करणे योग्य नाही.

### ...पण भाकरीच थांबली!

राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवारांनी निवृत्तीचा निर्णय जाहीर केल्यावर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक ट्वीट केले होते. त्यात राऊत म्हणाले होते की, 'पवार भाकरी फिरवण्याबद्दल बोलले होते, पण यांनी तवाच फिरवला. याबाबत एका माध्यमाच्या प्रतिनिधीने पवारांना प्रश्न विचारल्यावर ते म्हणाले, मी भाकरी फिरवायला निघालो होतो, पण भाकरीच थांबली. दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना कुणाला सोडून जायचे असेल, तर मग कोणत्याही पक्षाचा असो कोणी थांबवू शकत नाही, असेही त्यांनी म्हटले. पुढे बोलताना अजित पवार दिल्लीला गेले ही चुकीची माहिती आहे, असे सांगून सुप्रिया सुळे अध्यक्ष होईल यात तथ्य नाही, असेही खासदार पवार यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेसने दहशतवाद पोसला -पंतप्रधान मोदी

**बेल्लारी (कर्नाटक) : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. ५) कर्नाटक विधानसभा निवडणुकीत बेल्लारी येथे जाहीर सभेला संबोधित करताना काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. दहशतवादाविरोधात भाजपची भूमिका कठोर राहिलीये, मात्र जेव्हा दहशतवादावर कारवाई होते, तेव्हा काँग्रेसला पोटदुखी होते. व्होटबँकेमुळे काँग्रेस दहशतवादावर चकार शब्दही काढत नाही. काँग्रेसने दहशतवाद पोसला आहे, असा आरोप पंतप्रधान मोदींनी या वेळी केला.

आपल्या व्होटबँकसाठी काँग्रेसने दहशतवादासमोर गुडघे टेकल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. असा पक्ष कधी कर्नाटकाच्या सीमेचे रक्षण करू शकेल? कर्नाटकाला देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य बनवण्यासाठी संरक्षण, कायदा सुव्यवस्था आवश्यक आहे. कर्नाटकचे दहशतवादमुक्त राहणेही तितकेच आवश्यक आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

येडियुरप्पा आणि बोम्मई यांच्या नेतृत्वाखाली डबल इंजिन सरकारला केवळ साडेतीन



### 'द केरळ स्टोरी'चा उल्लेख

**या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द केरळ स्टोरी चित्रपटाचा उल्लेख केला. ते म्हणाले की, सध्याच्या घडीला 'द केरळ स्टोरी'ची जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटातून दहशतवादी कटाचा पर्दाफाश केलाय, पण या चित्रपटावर बंदी आणावी अशी काँग्रेसची इच्छा आहे. त्यामुळे जनतेला काँग्रेसपासून सावध राहण्याची गरज आहे.**

वर्षेच सेवा करण्याची संधी मिळाली. जेव्हा इकडे काँग्रेसचे सरकार होते तेव्हा त्यांनी भ्रष्टाचाराला प्राधान्य दिले. याचे कारण काय होते? त्यांच्याच माजी पंतप्रधानांनी सांगितले होते की, त्यांचे सरकार १०० पैसे पाठवते, पण १५ पैसेच गरीबांपर्यंत पोहचतात. एकीकडे त्यांनीच मान्य केले की काँग्रेस ८५ टक्के कमिशनचा पक्ष आहे, अशी टीका पंतप्रधान मोदींनी केली.


काँग्रेसच्या जाहीरनाम्यात अनेक खोटी आश्वासने आहेत. काँग्रेसचा जाहीरनामा म्हणजे लॉकडाऊन आणि तुष्टीकरणाचा गठ्ठा आहे. आता काँग्रेसची अवस्था इतकी वाईट झाली आहे की त्यांचे पाय थरथर कापत आहेत आणि म्हणूनच माझ्या जय बजरंग बली बोलण्यावरही त्यांना आक्षेप आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

# पराग बोरसे व शिष्यांच्या चित्रांचे सिंगापूरमध्ये प्रदर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे जगप्रसिद्ध चित्रकार पराग बोरसे यांची चित्रे आजवर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात प्रदर्शित झाली आहेत तसेच बोरसे हे विविध पुरस्कारांचे मानकरीदेखील ठरले आहेत. आता त्यांच्या व शिष्यांच्या चित्रांचे प्रदर्शन सिंगापूरमध्ये भरविण्यात आले आहे. आजवर कुठल्याही भारतीय चित्रकारासमवेत त्याच्या देश-विदेशातील विद्यार्थ्यांच्या चित्रांचे प्रदर्शन सिंगापूरमध्ये भरवण्याची ही पहिलीच वेळ असावी.





दोन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोनाच्या संकटाने अनेक चांगल्या-वाईट गोष्टींना जन्म दिला. लॉकडाऊनच्या काळात सर्व आर्ट गॅलरी बंद असताना मुबलक वेळ हाती मिळाल्यामुळे पराग बोरसे यांनी चित्रकला ऑनलाइन शिकवण्यास सुरुवात केली. या संधीचा लाभ अमेरिका, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, दुबई, मस्कत तसेच भारतामध्ये राहणाऱ्या अनेक कला विद्यार्थ्यांनी घेतला. गेली दोन वर्षे या विविध देशांतील विद्यार्थ्यांनी बोरसेंकडे चित्रकला शिकून जी चित्रे साकारली, त्यातील काही निवडक अशा कलाकृतींचे प्रदर्शन सिंगापूरमधील द व्हिज्युअल आर्ट्स सेंटर या कला दालनात भरवण्यात आले आहे.

### सर्व महिला कलाकार

*पुरुषप्रधान असलेल्या चित्रकलेच्या क्षेत्रात तेही एवढ्या मोठ्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्वच्या सर्व कलावंत महिला आहेत. या प्रदर्शनाच्या निमित्ताने पराग बोरसे यांनी कलाक्षेत्रातील पुरुषप्रधान परंपरेला छेद देत स्त्रियादेखील चित्रकलेच्या क्षेत्रात मुळीच मागे नाहीत हे जगाला दाखवून दिले आहे.*



**पनवेल : भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या खारघर तळोजा अध्यक्षपदी साधना पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पवार यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्या महिला उपस्थित होत्या.** (वृत्त पान ३ वर..)

## निवडक

### जम्मू काश्मिरमध्ये दहशतवादी हल्ल्यात पाच जवान शहीद

**श्रीनगर** : मुसळधार पाऊस आणि दृष्यमानता कमी झाल्याचा फायदा घेत दहशतवाद्यांनी शुक्रवारी (दि. ५) भारतीय सैन्याच्या वाहनावर जम्मू काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात ग्रेनेड हल्ला केला. या हल्ल्यात पाच जवान शहीद झाले आहेत. या चकमकीत काही दहशतवाद्यांचाही खात्मा करण्यात जवानांना यश आले असून भारतीय सैन्याकडून सर्च ऑपरेशन सुरूच आहेत.

### उद्धव ठाकरेंच्या बारसूतील सभेला परवानगी नाकारली

**रत्नागिरी** : बारसू रिफायनरी प्रकल्पाविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलकांना भेटण्यासाठी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे शनिवारी (दि. ६) तेथील दौरा करणार आहेत, मात्र कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलिसांनी उद्धव ठाकरेंच्या सभेला परवानगी नाकारली आहे. दरम्यान, याच दिवशी भाजप-शिवसेना रिफायनरीच्या समर्थनात मोर्चा काढणार आहेत.

### एमपीत जुन्या वादातून एकाच कुटुंबातील सहा जणांची हत्या

**भोपाळ** : १० वर्षांपूर्वी झालेल्या जुन्या वादातून एकाच कुटुंबातील सहा जणांची हत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. ५) मध्य प्रदेशच्या मुरैना जिल्ह्यातील लेपा गावात घडली. या घटनेनंतर गावात तणावाची स्थिती निर्माण झाली असून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



# पुनर्विकास प्रकल्पांसाठी नवे धोरण



## मुख्यमंत्र्यांची रहिवाशांना ग्वाही

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील पुनर्विकास रखडलेल्या प्रकल्पांचा सर्वंकष आढावा घेऊन नवे धोरण निश्चित करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. ४) येथे दिली. आमदार सदा सरवणकर यांच्या नेतृत्वाखालील दादर परिसरातील पुनर्विकास रखडलेल्या इमारतींच्या रहिवाशांच्या शिष्टमंडळासमवेत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृहावर बैठक झाली. या बैठकीस गृहनिर्माण विभागाच्या प्रधान सचिव वल्सा नायर-सिंह, म्हाडाच्या मुंबई इमारत व पुनर्रचना मंडळाचे मुख्याधिकारी अरूण डोंगरे आदी उपस्थित होते.

सरवणकर यांनी दादर परिसरातील उपकरप्राप्त इमारतीच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांची माहिती दिली.या परिसरातील अशा रखडलेल्या ५६ इमारतींमधील सुमारे साडे तीन हजार कुटुंबांची परिस्थिती बिकट झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. त्यावर, रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांबाबत धोरण निश्चित करण्याची गरज आहे. दादर परिसरातील या ५६ इमारतीच्या रखडलेल्या पुनर्विकासाची सर्वंकष माहिती घेण्यासाठी, प्रत्येक इमारतीचे प्रश्न वेगळे असतील, तर त्याबाबत अभ्यास करण्यासाठी एक विशेष अधिकारी नियुक्त करण्यात येईल.

त्याचप्रमाणे एक आर्किटेक्टही नियुक्त करण्यात येईल. या दरम्यान म्हाडाने विहीत नियमानुसार पुनर्विकास रखडवणाऱ्या विकासकांवर कारवाई करावी. त्यांना नोटीस देणे, प्रकल्प अधिग्रहित करण्याच्या कार्यवाहीला गती द्यावी. काही विकासक पुनर्विकसित इमारतीतील जागा देण्याबाबत या कुटुंबांना टाळाटाळ करीत असतील, तर त्यांनाही समज देण्यात यावी. गेली कित्येक वर्षे पुनर्विकास रखडल्याने मुंबईतील या मूळ घर मालकांना मुंबईच्या बाहेर जावे लागले आहे. रखडलेले हे पुनर्विकासाचे म्हाडाप्रमाणेच अन्य यंत्रणांच्या माध्यमातून कसे पूर्ण करता येतील, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

दादर परिसरातील विकासकांमुळे रखडलेल्या ५६ प्रकल्पांबाबत विशेष अधिकारी तसेच आर्किटेक्ट नियुक्त करण्यात यावा, या प्रकल्पांचे रखडलेले काम मार्गी लावण्यासाठी समूह पुनर्विकासह विविध पर्याय तपासण्यात यावेत, प्रकल्प रखडवणाऱ्या आणि विस्थापित झालेल्या कुटुंबांना भाडे न देणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी या वेळी दिले.

**विकासकामे ‘मिशन मोडवर’ पूर्ण करण्याच्या सूचना**

राज्यात सुरू असलेली आणि प्रस्तावित विविध विकासकामे मिशन मोडवर पूर्ण करावीत. जेणेकरून सामान्य नागरिकांना त्याचा लाभ मिळू शकेल, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी येथे विविध विभागांच्या सचिवांना दिले. मुख्यमंत्र्यांनी गुरुवारी विविध विभागातील लोकप्रतिनिधींच्या मतदारसंघातील विकासकामांचा आढावा घेतला. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खेळांची आणि मनोरंजनाची मैदाने देखभाल तत्त्वावर हस्तांतरित करण्यास शासनाने दिलेली स्थगिती उठवावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यासंदर्भात एक धोरण तयार करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्तांना दिले.

# रुग्णांना ६० कोटींच्या वर मदत

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची उत्कृष्ट कामगिरी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने रुग्ण सेवेत उत्कृष्ट कामगिरी करुन राज्यातील हजारो रुग्णांच्या जीवनात निरामय आरोग्याचा प्रकाश आणला आहे. आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीचा आलेख कायम राखत या कक्षाने अवघ्या दहा महिन्यांत कक्षाकडून ८१९२ रुग्णांना एकूण ६० कोटी ४८ लाख रुपयांची मदत दिली आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या दिवसापासून या योजनेचे मूळ संकल्पक तथा कक्ष प्रमुख मंगेश चिवटे आणि त्यांच्या सर्व टीमने रुग्णसेवेत झोकून दिले आहे.

त्यामुळेच पहिल्याच जुलै महिन्यात १९४ रुग्णांना ८३ लाखांची मदत देण्यात आली. नंतर ऑगस्ट महिन्यात २७६ रुग्णांना एक कोटी ४० लाख, सप्टेंबर महिन्यात ३३६ रुग्णांना



एक कोटी ९३ लाख, ऑक्टोबर महिन्यात २५६ रुग्णांना दोन कोटी २१ लाख, नोव्हेंबर महिन्यात ५२७ रुग्णांना चार कोटी ५० लाख,डिसेंबर महिन्यात १०३१ रुग्णांना आठ कोटी ५२ लाख, जानेवारी २०२३ मध्ये १०६० रुग्णांना आठ कोटी ८९ लाख तर फेब्रुवारी २०२३मध्ये १२३७ रुग्णांना १० कोटी २७ लाख, मार्च २०२३ मध्ये १४६९ रुग्णांना ११ कोटी ९५ लाख तर एप्रिलमध्ये विक्रमी १९८४ रुग्णांना नऊ कोटी ९३ लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

**राज्यातील एकही सर्वसामान्य गोरगरीब, गरजू रुग्ण पैशांअभावी उपचाराविना राहणार नाही याची काळजी घ्या, असा आदेशच संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आम्हाला पहिल्या दिवशी दिला होता. त्यांच्या सुचनेचे तंतोतंत पालन करण्याचा आणि रुग्णांना दिलासा देण्याचा आम्ही सर्व सहकारी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे.**
**-मंगेश चिवटे, प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष**

# नागोठण्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर अतिक्रमण

## भाजपचे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी वेधले लक्ष

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे एसटी स्टँड येथील मुख्य रस्त्यालगत मिलिंद रवींद्र ताले, शोभा रवींद्र ताले यांनी पीडब्ल्यूडीच्या शासकीय जागेत अतिक्रमण करून जागा आपल्या कब्जात केली आहे. पूर्वीपासून लोकांच्या रहदारीचा रस्ता बंद केला आहे. याप्रकरणी नागोठणे भाजपचे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी लेखी तक्रार उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग रोहा देवकाते यांच्याकडे केली होती.

वारंवार पाठपुरावा केल्यानंतर केवळ देखावा म्हणून संबंधित अधिकाऱ्याने मिलिंद रवींद्र ताले यांना १९ डिसेंबर २३ रोजी जा. क्र. १/१५३०ने आपले अवैध बांधकाम काढून टाकण्यात यावे याबाबत नोटीस दिली तसेच त्याची एक प्रत नागोठणा पोलीस स्टेशन व तहसीलदार यांना दिली. अधिकाऱ्यानी संबंधिताला दुसरी नोटीस पाठवून बांधकाम आम्ही तोडून टाकू अशी हमी मोदी यांना दिली, मात्र बरेच दिवस झाले तरी बांधकामबाबत कारवाई न केल्याने मोदी यांनी याबाबत परत पाठपुरावा केला, परंतु कुठलीच कारवाई केली नाही. शासकीय जागेत अतिक्रमणाविरुद्ध इसमाला दुसरी नोटीस दिल्याची प्रत मिळणेबाबत मोदी यांनी माहिती अधिकार भरला असता त्याला उप अभियंता देवकाते यांनी आजपर्यंत कुठल्याही प्रकारचे उत्तर दिले नाही. याबाबत मोदी यांनी बांधकाम विभाग महाड यांच्याकडे अपील दाखल केले आहे. संबंधित अधिकारी शासनाच्या जागेवर भली मोठी इमारत उभी राहण्याची वाट पाहत आहेत का असा सवाल मोदी यांनी यावेळी उपस्थित केला. नागोठणे शहरातील या मुख्य रस्त्यावर बरीच ट्राफिक असते भविष्यात रस्ता रुंदीकरण होणार आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण व आमदार रवी पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सदर अधिकारी विरुद्ध कारवाई करण्याचे लेखी पत्र शहर अध्यक्ष सचिन मोदी देणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

या संदर्भात रोहा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अरुण देवकाते यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

**नागोठणे भारतीय जनता पक्ष हे नागोठण्यातील बेकायदेशीरपणे होणाऱ्या सार्वजनिक जागेवर अतिक्रमण होऊ देणार नाही व त्याबाबत वेळप्रसंगी संबंधित खात्याच्या कार्यालयावर मोर्चा काढू.**
**-सचिन मोदी, अध्यक्ष, नागोठणे शहर भाजप**

**जागेचा विषय हा न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालय जो निर्णय देईल तो आम्हाला मान्य असेल.**
**-मिलिंद ताले, ग्रामस्थ**



**रोहा : समर्पण ध्यान केंद्र नवीन पनवेल यांच्यातर्फे रोहा येथे गुजराती महिला मंडळ आयोजीत समर्पण ध्यान धारणा मार्गदर्शन कार्यक्रम बुधवारी चैत्यनपूर्ण वातावरणात पार पडला. हर्षा सोळंकी, अनिता जोशी, शमा जोशी, प्रणित जोशी यानी वर्तमान युगात ध्यानाचे महत्व काय असते याचे मार्गदर्शन केले. या वेळी लायन्स क्लब, रोटरी क्लबच्या महिलांनी सहभाग दर्शविला. या वेळी ध्यानाचे प्रात्यशिक घेण्यात आले, तसेच आठ दिवसांचे ध्यान योग शिबिर घेण्याचेही ठरविण्यात आले.**

# चौक परिसरात विजेचा खेळखंडोबा; नागरिक त्रस्त

**चौक : प्रतिनिधी**

चौक परिसरातील गावात होणारा वीजपुरवठा कोणतीच पूर्व सूचना न देता दिवसभर बंद करण्याची पद्धत गेली काही दिवस सुरू आहे. त्यामुळे येथील नागरिक त्रस्त आहेत.

महाराष्ट्र वीज वितरण यांच्याकडून चौक परीसरात होणारा विजपुरवठा कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करण्याची पद्धत काही दिवस या परिसरात सुरू आहे. अचानक खंडीत झालेल्या विजपुरवठा यामुळे प्रत्येक गावातील ग्रामपंचायत मार्फत होणार पाणी पुरवठा खंडित होतो, त्यामुळे महिला वर्ग त्रस्त होत आहे. घर बांधणी, वेल्डिंग करणारा, संगणक प्रशिक्षण संस्था, छायांकित प्रति, यांना मोठे नुकसान सहन करावे लागते.



शीतपेय, दूध, दही, मिठाई यांच्या दुकानदारांचे नुकसान होत आहे. येथील विद्युत मंडळाचे कर्मचारी, कनिष्ठ अभियंता यांची सेवा चांगल्या प्रकारे आहे, तर ठेकेदार यांचीच अरेरावी जास्त असते अशी चर्चा विद्युत मंडळाचे कर्मचारी खाजगीत करतात. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे. महा भयंकर उन्हाळा सुरू आहे. घरी पंखा, एसी अशी उपकरणे बंद राहिल्याने आजारी माणसे व लहान मुलांना त्रास होतो. त्यामुळे दिवसभर कामे करावयाची असल्यास तशी सूचना ग्रामपंचायत यांना द्यावी, अशी अपेक्षा सामान्य जनतेची आहे.

# खंडाळा घाटातील मॅजिक पॉईंटचा रस्ता लहान वाहनांसाठी खुला

**खोपोली : प्रतिनिधी**

एप्रिल महिन्यात झालेल्या अपघातानंतर खंडाळा ते खोपोली मॅजिक पॉईंटचा रस्ता सर्व वाहनांसाठी बंद ठेवण्यात आला होता. हा रस्ता बंद झाल्याने खोपोलीकरांची मोठी गैरसोय होत होती. संपूर्ण खोपोली शहर व खंडाळा घाटातील दस्तुरी, गारमाळसह अन्य धनगर वाड्यामधील रहिवाशांची होणारी गैरसोय थांबविण्यासाठी वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केलेला हा रस्ता गुरुवारपासून सुरू करण्यात आला आहे.

दोन्ही बाजूला अडीच मीटर उंचीचे कायमस्वरूपी हाईट बॅरियर उभे केल्याने आत्ता या रस्त्यावरून कार, रिक्षा व दुचाकीनांच प्रवेश करता



येणार आहे.

मॅजिक पॉईंटचा रस्ता हा कार साठी खुला करण्यात आला आहे. कोणतेही अवजड वाहन ट्रक, टेम्पो, पिकप, जीप किंवा प्रवाशी वाहने अंडा पॉईंटच्या दिशेने प्रवास करू शकणार नाहीत. पिकप जीपची उंची ही उभारण्यात आलेल्या हाईट बॅरियरमध्ये बसत नाही. त्यामुळे अशा कोणत्याही वाहनांनी या रस्त्यावर प्रवेश करू नये असे निवेदन खंडाळा घाट महामार्ग वाहतूक पोलीस, आयआरबी यांनी प्रसिद्ध केले आहे.

संबंधित यंत्रणेकडून करण्यात आलेल्या या उपाययोजनांची खोपोलीतील नागरिकांनी स्वागत केले असून यामुळे कोणतेही मोठे व वाहन, प्रवाशी वाहन या मार्गाने खोपोलीच्या दिशेने किंवा खोपोली मार्गाने खंडाळा दिशेने जाणार नसल्याने येथे वारंवार होणाऱ्या भीषण अपघातांना आळा बसणार आहे. नागरिक, वाहनचालकांनीही याबाबत खबरदारी घेऊन सहकार्य करण्याचे आवाहन खंडाळा घाटक्षेत्र वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी केले आहे.

# फणसाड अभयारण्यातील वन्यजीवांची आज गणना



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील सुपेगाव येथे फणसाड अभयारण्य हे सुमारे ५४ किमी. चौरस परिक्षेत्रात विस्तारलेले असून जैवविविधतेने समृद्ध अशा अभयारण्यात विविध पक्षी, प्राणी व इतर वन्यजीव यांचा वैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास होत असुन त्याचे योग्य संवर्धन वन विभागातर्फे केले जात आहे .

जैव विविधतेमध्ये १७ प्रजातींचे साप, १२ उभयचर प्राणी, १६ सस्तन प्राणी, २५ प्रजातींचे कोळी,१४ सागरी जीव आणि तब्बल १३२ प्रजातींची फुलपाखरे, १९ प्रकारचे प्राणी ज्यामध्ये बिबट्या, सांबर, भेकर तसेच अलिकडे रानगवे आणि रानकुत्र्यांचा ही समावेश आहे. सर्वात महत्वाचे म्हणजेफणसाड अभयारण्यात तब्बल २७ पाणस्थळे आहेत. यातील चिखलगाण पाणस्थळावर अनेक पक्षी, प्राणी येतात. त्यांचे जवळून निरीक्षण करता यावे म्हणून एक खास घर बांधण्यात आले आहे, तसेच पुण्याचा माळ, चाकाचा माळ, दांडा, गाडग्याचा माळ या ठिकाणी निरीक्षणा साठी उंच मनोरे उभारण्यात आले आहेत. आज बौद्ध पौर्णिमा असल्याने चंद्राचा प्रकाश हा प्रखर असल्याने महाराष्ट्रातील सर्व अभयारण्यात आज वन्यजीवांची गणना केली जाते. शनिवारी (दि. ६) सायंकाळी सहा ते सकाळी ७ वाजेपर्यंत वन्यजीव यांची गणना करण्यात येणार असून निसर्गप्रेमी संघटना व फणसाड अभयारण्य कर्मचारी असे एकंदर ४५ कर्मचारी १४

## ४५ कर्मचारी विशेष तैनात

ठिकाणच्या पाणवट्यावर विविध वन्यजीवांची गणना करणार असल्याची माहिती अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर यांनी दिली आहे.

पाणवट्यावर विविध वन्यजीव पाणी पिण्यासाठी येत असतात अशावेळी नियुक्त केलेले कर्मचारी त्यानुसार गणना करून कार्यलयास अहवाल देत असतात.१४ ठिकाणी लाकडाच्या साह्याने बांधण्यात आलेल्या मचाणावर बसून हे कर्मचारी जागता पहारा देणार असल्याची माहितीसुद्धा तुषार काळभोर यांनी दिली आहे. गणना एक दिवसाची असून वन्यजीव पाणी पिण्यासाठी पाणी असलेल्या ठिकाणी येत असतात. विशेष खबरदारी म्हणजे कोणताही आवाज न करता व वन्यजीव यांच्या दृष्टीस न पडता अत्यन्त सावधपणे हि गणना केली जात असल्याची माहिती यावेळी काळभोर यांनी दिली. फणसाड अभयारण्यात २७ पाण्याचे स्तोत्र असून त्यापैकी वन्यजीव मोठ्या प्रमाणात पाणी पिण्यासाठी येतात अशी ठिकाणे गणनेसाठी निवडण्यात आली आहे.

फणसाड अभयारण्यात सध्या बिबट्यांची संख्या वृद्धींगत झाली असून येथे रानगवे यांचीसुद्धा संख्या वाढली आहे. लवकरच गणना संपन्न झाल्यावर हे आकडे कळणार असल्याने वन्यजीव प्रेमी यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# किहीम येथे फिरत्या वैद्यकीय चिकित्सा वाहनसेवेचा शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स (आरसीएफ) लिमिटेड, थळतर्फे निगमित सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत कारखाना परिसरातील ग्रामपंचायत हद्दीत फिरते वैद्यकीय चिकित्सा वाहन (मोबाइल मेडिकल व्हॅन) माध्यमातून विनामूल्य वैद्यकीय सेवा सुरू करण्यात येत आहे. स्वागत अतिथीगृह, आरसीएफ कॉलनी किहीम शुक्रवारी (दि. ५) दुपारी ३.३० वाजता येथे कार्यकारी संचालक (थळ) अनिरुद्ध खाडिलकर आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांच्या हस्ते सेवेचा शुभारंभ करण्यात आला.



कारखाना परिसरातील ग्रामस्थांचे आरोग्यमान उत्तम रहावे या दृष्टीने आरसीएफतर्फे सीएसआरच्या माध्यमातून कारखाना परिसरातील ग्रामपंचायत हद्दीत फिरते वैद्यकीय चिकित्सा वाहन (मोबाइल मेडिकल व्हॅन) माध्यमातून विनामूल्य वैद्यकीय सेवा देण्याचा उपक्रम राबविला जातो. मागील दोन वर्षात कोरोना प्रतिबंधामुळे ही सेवा खंडित होती. यावर्षी वोकार्ड फाउंडेशनच्या माध्यमातून ही सेवा पुन्हा सुरू करण्यात येत आहे. या अंतर्गत वोकार्ड फाउंडेशनच्या तज्ज्ञ डॉक्टर्स आणि फार्मासिस्टसह दोन मेडिकल व्हॅन्स कारखाना परिसरातील गावातील नियोजित स्थळी गरजूंची विनामूल्य तपासणी करून औषधे देतील.

या सेवेचा शुभारंभ प्रसंगी कार्यकारी संचालक (थळ) अनिरुद्ध खाडिलकर यांनी सद्य परिस्थितीत सर्वांगीण स्वास्थ्याचे महत्व विशद करून सीएसआरच्या माध्यमातून कारखाना परिसरात लोकोपयोगी उपक्रम राबविले जातील याची ग्वाही दिली. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांनी आरोग्यवर्धीनी प्राथमिक आरोग्य केंद्रांना आरसीएफ सीएसआरचे वेळोवेळी लाभणारे सहाय्य आणि परिसरातील नागरिकांच्या एकंदरीत स्वास्थ्यासाठी आरसीएफ राबवित असलेल्या उपक्रमांचे कौतुक करून फिरते वैद्यकीय चिकित्सा वाहन (मोबाइल मेडिकल व्हॅन) उपक्रमास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी थळ सरपंच सुनील पत्रे, नवगाव सरपंच प्रियांती घातकी, बोरिस-गुंजीस सरपंच सदिच्छा पाटील, मानतर्फे झिराड सरपंच अस्मिता म्हात्रे, वरसोली सरपंच प्रमिला भाटकर, आणि वेश्वी ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश गावडे, उपसरपंच, ग्रामसेवक आणि आरसीएफचे कार्यकारी संचालक-प्रचालन सुनील ठोकळ, महाव्यवस्थापक (मानव संपदा प्रशासन)-प्रभारी संजीव हरळीकर, उपमहाव्यवस्थापक (मानव संपदा प्रशासन)-प्रभारी विनायक पाटील यांसह इतर अधिकारी वर्ग व वोकार्डचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# समाजकंटकांना गोळ्या घाला; केंद्रीय गृहमंत्री शाहांचे जवानांना आदेश

**चुराचंदपूर : वृत्तसंस्था**

भारतातील पूर्वोत्तर भागात असलेले राज्य मणिपूर सध्या धगधगत आहे. तिथे मोठ्या प्रमाणात हिंसाचार आणि जाळपोळ सुरू आहे. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तातडीची बैठक बोलवली होती. या बैठकीनंतर त्यांनी मणिपूरमधील सुरक्षा वाढवली असून दिसताक्षणी समाजकंटकांना गोळ्या घालण्याचे आदेशदेखील दिले आहेत.

**नेमकं काय घडतंय?**

राज्याच्या लोकसंख्येपैकी ५३ टक्के नागरिक हे मेईती समुदाय अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याची मागणी करत आहे. या विरोधात चुराचंदपूर जिल्ह्यातील तोरबांग भागात ऑल ट्रायबल स्टुडंट युनियन मणिपूरच्या वतीने आदिवासी एकता मार्च काढण्यात आला. बुधवारी या निदर्शनात मोठ्या प्रमाणात जाळपोळ आणि हिंसाचार झाला. मणिपूर उच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात राज्य सरकारला मेईती समुदायाच्या एसटी दर्जाच्या मागणीवर चार आठवड्यांच्या आत केंद्राकडे शिफारस पाठवण्यास सांगितले होते. त्यानंतरच आदिवासी एकता मोर्चा काढण्यात आला.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हिंसाचारग्रस्त मणिपूरमधील परिस्थिती हाताळण्यासाठी भारतीय लष्कर आणि आसाम रायफल्सला पाचारण करण्यात आले. त्यानंतर १०,००० लोकांना सुरक्षित ठिकाणी घेऊन गेले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यास गोळ्या घालण्याचे आदेश देण्यात आल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले.

# जीवरक्षकांना सुरक्षा साधनांची प्रतीक्षा

## आपत्कालीन स्थितीत स्थानिकांची घ्यावी लागते मदत

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरणच्या पिरवाडी परिसरातील समुद्रात दोन पर्यटक अडकल्याची माहिती मिळताच नागाव-पिरवाडीमधील सागरी रक्षा दलाच्या तरुणांनी मिळेल, त्या साधनाने त्यांना वाचविण्याची तयारी केली. यांत्रिक बोटीच्या सहाय्याने दोन जीवरक्षकांनी खडकात जात शहानिशा केली, तर ती माणसे नव्हती तर श्वान असल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांनी सुटकेचा निःश्वास सोडला. ही घटना शुक्रवारी (दि. ५) घडली. या निमित्ताने येथील स्वयंसेवी सागरी जीवरक्षकांच्या सुरक्षेसाठी कोणतीच सुरक्षा साधने आणि उपकरणे उपलब्ध नसल्याचे चित्र समोर आले. त्यामुळे पुन्हा एकदा उरणच्या सागरी सुरक्षा ऐरणीवर आली आहे.



पिरवाडी समुद्रातील खडकात शुक्रवारी दुपारी भरतीचे पाणी वाढल्याने कोणीतरी अडकले असल्याले स्थानिकांना दिसले. यात दोन माणसे असावीत, असा संशय त्यांनी व्यक्त केला. त्यानुसार स्थानिक सागरी रक्षकांनी उरण पोलिसांना सूचना दिली. त्यामुळे पोलीस सज्ज झाले.

अग्निशमन दलालाही पाचारण करण्यात आले. त्याचवेळी स्थानिकांच्या मदतीने सागरी सुरक्षारक्षकांनी त्यांच्याच बोटीने खडकाजवळ जात शहानिशा केली. त्या वेळी खडकात माणसे नसून दोन श्वान अडकल्याचे निष्पन्न झाले. असे असले तरीदेखील या सागरी सुरक्षा रक्षकांकडे कोणत्याही प्रकारची साधने नाहीत. आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा रक्षकांना स्थानिकांची साधने वापरावी लागतात.

उरणला पिरवाडी व केगाव-दांडा हे दोन समुद्रकिनारे आहेत. या दोन्हीपैकी पिरवाडी किनाऱ्यावर मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. येथील पिरवाडी दर्याच्या पुढे ओहोटीच्या वेळी समुद्रातील खडकापर्यंत पर्यटक जात असतात.

किनाऱ्यावर अनेक पर्यटक समुद्रात पोहतात. समुद्राच्या भरतीच्या पाण्याचा अंदाज न आल्याने तसेच पाण्याचा वेग पाहता पर्यटक वाहून जाण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. त्यांना वाचविण्यासाठी सागरी सुरक्षा दल आहे. त्यासाठी येथील स्थानिक तरुण स्वयंसेवी भावनेतून जिवावर उदार होऊन पर्यटकांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र त्यांच्याजवळ आवश्यक ती सुरक्षा उपकरणेच नसल्याची त्यांची तक्रार आहे.



# खारघर तळोजा भाजप महिला मोर्चा अध्यक्षपदी साधना पवार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रशांत ठाकूर व उत्तर रायगड महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या मान्यतेने, खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल व ज्येष्ठ नेते प्रभाकर जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजप खारघर तळोजा मंडल महिला मोर्चा अध्यक्षपदी साधना अशोक पवार यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

साधना पवार या २०१४पासून आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत जबाबदारीने पक्ष संघटनेचे कार्य करीत आहेत. दोन टर्म महिला मोर्चा सरचिटणीस म्हणून यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली आहे. शक्ती केंद्र म्हणूनसुद्धा त्या सध्या काम पाहत आहेत. खारघरमधील मराठा समाजाच्या उपाध्यक्ष तसेच युनिटी महिला मंडळाच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. सध्या शिवबंधन प्रतिष्ठानच्या अध्यक्ष म्हणून सामाजिक कार्य करीत आहेत. यामुळेच त्यांना भारतीय जनता पक्ष खारघर मंडल महिला मोर्चा अध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली आहे.

याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नाप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी साधना पवार यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.


या वेळी माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, खारघर सरचिटणीस दीपक शिंदे, सोशल मीडिया जिल्हा संयोजक मोना अडवाणी, अजय माळी, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष अनिल साबणे, संतोष शर्मा, अशोक पवार, विजय भोसले, ब्रिजमोहन, मधुमिता जेना, अश्विनी भुवड, अर्चना घोरपडे, वैशाली देसाई, मीनाक्षी अंथवाल, स्नेहल बुधाई, कांचन बिर्ला, लक्ष्मी सरकार, सोनिया गव्हाणे, प्रिया दळवी, निर्मला यादव, प्राजक्ता शिंदे, संध्या भोसले, बिंदियाजी उपस्थित होते.

नियुक्तीबद्दल खारघर तळोजा परिसरातील सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांकडून साधना पवार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# चिंचपाडा येथील काळभैरव मंदिरात चोरी करणारे आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत चिंचपाडा सेक्टर आर ३ येथील काळभैरव मंदिरातील कडीकोयंडा तोडून मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेरे व दानपेटीमधील रक्कम चोरी झाल्याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीतील मुद्देमाल जप्त केला आहे.



मंदिराच्या मुख्य दरवाजाचा कडीकोयंडा उचकटून चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास आत प्रवेश करून मंदिरामध्ये असलेल्या तीन दानपेट्यांमधील रोख रक्कम तसेच परिसरातील सहा सीसीटीव्ही कॅमेरे चोरून नेले होते. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक दिलीप शिंदे (प्रशासन), प्रमोद पवार (गुन्हे), उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार रवींद्र राऊत, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, पोलीस नाईक विनोद देशमुख, रवींद्र पारधी, शिपाई प्रसाद घरत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदारांच्या आधारे माहिती घेतली.

आरोपी रोहित साळुंखे (रा. कामोठे गाव) व मारुती केंद्रे (रा. छोटा खांदा) यांच्याबाबत माहिती मिळाल्याने दोन आरोपींना सापळा रचून पनवेल परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. त्यांच्याकडून चोरी केलेला मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.



# उरणमध्ये बुद्धपौर्णिमा उत्साहात

**उरण : बातमीदार**

बौद्धजन पंचायत समिती शाखा नंबर ८४३ व माता रमाई महिला मंडळ उरण बौद्धवाडी यांच्या वतीने बुद्धपौर्णिमा साजरी करण्यात आली.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उरण वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे, सोनवणे, शिंदे, अध्यक्ष प्रकाश कांबळे, उपाध्यक्ष हरेश जाधव, चिटणीस विजय पवार, खजिनदार अनंत जाधव, हर्षद कांबळे, विनोद कांबळे, मारुती तांबे, हरिश्चंद्र गायकवाड, बौद्धचार्य महेंद्र साळवी, प्रमोद कांबळे, शुद्धोदन जाधव, अखिलेश जाधव, प्रज्वल वाघमारे, कविता जाधव, प्रतीभा कवडे उपस्थित होते.

# बुद्धपौर्णिमेनिमित्त पनवेलमध्ये अभिवादन

## डॉ. आंबेडकर भवनमध्ये विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ

**पनवेल : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महापालिकेने लोकसहभागातून विविध स्पर्धांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरी केली होती. या स्पर्धेतील विजेत्यांना शुक्रवारी (दि. ५) बुद्धपर्णिमेनिमित्त आंबेडकर भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात विजेत्यांना रोख रक्कम व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी उपयुक्त गणेश शेटे, माजी नगरसेवक बिनेदार, अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, डॉ. सुरेखा मोहकर तसेच महापालिका अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विविध संघटनेचे सदस्य, विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.

या वेळी उपायुक्त गणेश शेटे यांनी, उपस्थित विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केवळ निबंध लिहण्यापुरते नसावेत तर ते प्रत्यक्ष आचरणात आणावे, असे सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीसाठी देणगी दिलेल्या देणगीदारांचे सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# खारघरमध्ये ई-सिगारेटचा साठा जप्त : एकास अटक; साडेसहा लाखांचा माल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखेने खारघर सेक्टर ४मध्ये छापा टाकून सहा लाख ४४ हजार रुपये किमतीचा ई-सिगारेटचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी अर्जुन राठोड (वय २७) या तरुणावर गुन्हा दाखल केला आहे.

येथील श्री लक्ष्मण व्हिला इमारतीच्या गाळ्यामध्ये ई-सिगारेटचा साठा ठेवला असल्याची माहिती गुन्हे शाखेचे हवालदार संतोष गायकवाड यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे गाळ्यामध्ये छापा टाकला असता तेथे सहा लाख ४४ हजार १०० रुपये किमतीच्या विविध ई-सिगारेट आढळल्या. हा साठा जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अर्जुन राठोडविरोधात कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान शहरात असे गुन्हे उघडकीस येत असल्याने याबाबत पोलिसांनी ठिकठिकाणी गस्त वाढवली असून अधिक तपास सुरू केला आहे.

# ‘अवकाळी’ने भाज्यांची आवक झाली कमी!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या सुमारे १५ दिवसांपासून राज्यात विविध ठिकाणी कोसळत असलेल्या अवकाळी पावसामुळे याचसोबत काही ठिकाणी वाढत्या उष्णतेमुळे भाज्यांची आवक कमी झाली आहे. याचा परिणाम म्हणून भाज्यांचे दर वाढले आहेत.

कडक उन्हामुळे होणारे भाज्यांचे उत्पादन घटते. त्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे बाजारात कमी आवक होत आहे.

घाऊक बाजारात फरसबी, आले, कोथिंबीर महागली असून फरसबी प्रतिकिलो १२० रुपयांवर, तर अले प्रतिकिलो १३५ रुपयांवर गेले आहे. त्यामुळे गृहिणी वर्ग हैराण झाला आहे. हिवाळ्यात भाज्यांचे उत्पादन अधिक होत असते. त्यामुळे थंडीमध्ये बाजारात भाजीपाल्याची आवक अधिक असते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आज माजी विद्यार्थी बैठक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. ६) सकाळी ११ वाजता माजी विद्यार्थी समितीच्या वतीने माजी विद्यार्थ्यांसाठी बैठकीचे आयोजन केले आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय तसेच इतर वेगवेगळ्या महाविद्यालयातील वेगवेगळ्या शाखेतील माजी विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुरुजनांशी संवाद साधता यावा तसेच त्यांच्या अनुभवांचा फायदा महाविद्यालयासाठी व्हावा तसेच भविष्यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये व महाविद्यालयांमध्ये चांगले ऋणानुबंध असावेत यासाठी या बैठकीचे आयोजन केले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी सर्व शाखेतील माजी विद्यार्थ्यांना या बैठकीसाठी हजर राहण्याचे आवाहन केले आहे. या बैठकीमध्ये ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीचे आयोजन प्रा. अंकिता जांगिड (समन्वयक माजी विद्यार्थी समिती) यांनी केले आहे. प्रा. रेवन शिंदे प्रा. प्रवर शर्मा, प्रा. डॉ. अविनाश जुमारे हे सहकार्य करीत आहेत.





**पनवेल : येथील गुजराथी स्मशानभूमी परिसरात पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या वेळी पांडुरंग भोसले, रमेश मजिठीया, डॉ. पटेल, मधुकर भगत, गजानन भगत आदी उपस्थित होते.**

# घर देण्याच्या बहाण्याने फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरामध्ये स्वस्तात घर देण्याचे अमिष दाखवून फसवणूक करण्याचे प्रकार वाढत आहेत. चेंबूरमधील महिलेलाही घोट गावातील चाळीमध्ये घर देण्याचे अमिष दाखवून पाच लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.

चेंबूरमध्ये राहणाऱ्या मीना गवारे यांनी ओळखीच्या व्यक्तीच्या माध्यमातून मानसरोवर येथे कार्यालय असलेल्या उन्नीथन या व्यक्तीशी घरखरेदी करण्यासाठी व्यवहार केला होता. पनवेलजवळील घोट येथे चाळीमध्ये साडेसात लाख रुपयांना घर देण्याचे अमिष दाखविले होते. यासाठी जानेवारी २०१७मध्ये रोख दोन लाख रुपये देण्यात आले. नोव्हेंबर २०१७मध्ये चेकने तीन लाख रुपये दिले होते. घर खरेदीसाठी पाच लाख रुपये दिल्यानंतरही प्रत्यक्षात घर मिळाले नाही. पाठपुरावा केल्यानंतर फक्त आश्वासने देण्यात आली. घर मिळाले नाही व पैसेही परत दिले जात नसल्यामुळे संबंधितांविरोधात कामोठे पोलीस स्टेशनमध्ये चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

।। श्री गजानन प्रसन्न।।

पुण्यतिथी समारंभ

आपणांस कळविण्यात येत आहे की, आमच्या येथे सालाबादप्रमाणे स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत साहेबांचा ३९वा पुण्यतिथी समारंभ मिती वैशाख कृ.२, शके १९४५, रविवार, ०७/०५/२०२३ रोजी सकाळी ९ वाजता लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर आणि आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत होणार आहे. तरी आपण कार्यक्रमास अगत्य येण्याचे करावे, ही विनंती.

आपले नम्र
श्री. प्रकाश जनार्दन भगत
श्री. अजय जनार्दन भगत
श्री. संजय जनार्दन भगत

ठिकाण
भगत साहेब निवासस्थान,
मु. शेलघर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड

# सुधागडमध्ये बेकायदेशीर वृक्षतोड

## ■ वनराईची खुलेआम तोड करणाऱ्यांकडे वनविभागाचे दुर्लक्ष

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

हिरवेगार, शांत ठिकाण म्हणून सुधागड तालुक्याची ओळख आहे. मात्र सुधागड तालुक्यामध्ये काही विकासकानी वनराई नष्ट करण्याचा विडा उचलला आहे. सुधागड तालुक्यात अनेक ठिकाणी शेतघरांच्या नावाखाली मोठमोठे बंगले बांधण्या येते. जागा स्वच्छ करण्याच्या नावाखाली झाडांची तोड केली जाते. त्यातून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. मात्र याकडे वनविभाग कानाडोळा करीत आहे.



प्रशासनाच्या दुर्लक्षाचा फायदा घेत झाडे तोडून रस्त्यांसाठी वाटा मोकळ्या केल्या जात आहेत.अशा विकासकांना वनराई नष्ट करण्याची मुभा दिली आहे का? असा सवाल पर्यावरणप्रेमी करीत आहेत.

सुधागड तालुक्या डोंगर खोऱ्यामध्ये शेतीघरांच्या नावाखाली बंगले बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वनविभागाची परवानगी न घेता बेकायदेशीर झाडी नष्ट केली जात आहे. वारंवार वनखात्याला याबाबत अनेकदा नागरिकांकडून सूचित करण्यात येते पण वनविभागाकडून छोट्या छोट्या कारवाई करून या विकासकांना जंगलतोड करण्यासाठी मुभा दिली आहे की काय? असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित होत आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यात पर्यावरणाला बाधा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. एकंदरीत वनखात्याच्या या कारभारामुळे येथील वनसंपदा लोप पावत चालली आहे. वनविभाग विना परवानगी बेकायदेशीर वृक्ष तोड करणाऱ्यावर कारवाई करणार का? याकडे संपूर्ण सुधागड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# खोपोलीत दोन ठिकाणी घरफोडी; पावणे तीन लाखांचे दागिने लंपास

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यात खोपोली शहरात चोरटे पुन्हा सक्रिय झाले असून दोन बंद फ्लॅटमधील जवळपास पावणेतीन लाखाचे दागिने चोरट्यांनी चोरुन नेल्याच्या घटनेमुळे खळबळ माजली आहे

खोपोली पोलीस ठाणे हद्दीत माधव रेसीडन्सी समोर, गगनगिरी नगर खोपोली येथील महिला योगा करण्यासाठी लोहाना हॉल येथे गेल्या असताना आरोपीने घराचा लॉक उघडून घरात प्रवेश करुन पर्समध्ये ठेवलेले १ लाख ३५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले.

दुसऱ्या घटनेत चिन्मय नगर, मोगलवाडी, खोपोली येथील मुकुंद चिन्मय बिल्डींग पहिला मजला, फलॅट नं. ७ येथे घरात कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांचे बंद घराच्या खिडकीचे लोखंडी ग्रिल तोडून खिडकी उचकटून घरात प्रवेश करुन घरातील बेडरुममधील लाखंडी कपाटातील एकूण १ लाख ४१ हजार ४०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा मुद्देमाल चोरी करुन चोरटे पसार झाले आहेत.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे भा. दं.वि. कलम ३८०, ४५४, ४५७, ५११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार सचिन घरत हे करीत आहेत.

# सडवली येथे आज महाआरोग्य शिबिर

**पोलादपूर :** तालुक्यातील सडवली येथील खोत भावकी गोकुळनगर सडवली येथे शनिवार, दि. ६ मे २०२३ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीकुलस्वामीनी मंदिराचा वर्धापन दिन असल्याच्या निमित्ताने या महाआरोग्य शिबिराचे आयोजन मिशन फॉर व्हिजन फाऊंडेशन पुणे, लोकमान्य टिळक हॉस्पिटल चिंचवड तसेच ग्रामीण रूग्णालय पोलादपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विठ्ठल रुक्मीणी मंदिर सभागृहामध्ये करण्यात आले आहे.

# माणगाव येथील सामाजिक सभागृहाचे बांधकाम सुरू



**माणगाव : प्रतिनिधी**

जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथे नगरपंचायतीच्या नागरी सुविधा योजनेतून २५ लाख रुपये खर्चाच्या अनुदानातून मंजूर झालेल्या सामाजिक सभागृहाचे बांधकाम येथील जामा मस्जिद शेजारील जागेत सुरु करण्यात आले आहे. जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथे सामाजिक सभागृह साकारत असल्याने येथील नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे. जुने माणगाव मस्जिद मोहल्ला याठिकाणी सामाजिक सभागृह बांधण्यात यावा अशी मागणी गेली अनेक वर्षांपासून येथील मुस्लिम बांधवांची होती. या सामाजिक सभागृहासाठी शिवसेना उपनेते तथा विधिमंडळ पक्षप्रतोद आ. भरतशेठ गोगावले यांच्या विशेष प्रयत्नांनी व शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ॲड. राजीव साबळे, नगरपंचायतीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, वार्ड क्र. १७ मधील नगरसेवक दिनेश रातवडकर यांनी या कामी सतत पाठपुरावा करून नागरी सुविधा योजने अंतर्गत येथील सामाजिक सभागृहाला २५ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले. बऱ्याच कालावधीनंतर जुने माणगाव मस्जिद मोहल्ला याठिकाणी सामाजिक सभागृह होत असल्याने येथील मुस्लिम बांधव आनंदीत दिसत आहेत.

# मोरबे धरणाच्या बांधावरील प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन स्थगित

**चौक : प्रतिनिधी**

खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी मोरबे धरण प्रकल्पग्रस्तांच्या न्याय्य हक्कांसाठी मार्ग काढल्याने व मोरबे धरण प्रकल्प ग्रस्त कृती समिती यांच्या पदाधिकाऱ्यांना झालेला निर्णय मान्य झाल्याने मोरबे धरणाच्या बांधावर होणारे उपोषण मागे घेण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही सुरु असल्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी सांगितले.



नवी मुंबई महानगरपालिका व त्या परिसराला पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी या धरणाची निर्मिती तत्कालीन राज्य शासनाने केली आहे, मात्र आजही पुनर्वसन गावांना पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या नाहीत. अनेक गावांत टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. धरण बांधण्यापूर्वी येथील जमीन संपादन, लोकांचे पुनर्वसन,पुनर्वसन नंतर नागरी सुविधा आणि जमिनीचा योग्य मोबदला ही जबाबदारी त्यावेळच्या राज्य सरकारची होती. विशेष म्हणजे कोयना प्रकल्पग्रस्त गावे यात समाविष्ट आहेत. कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या न्याय्य हक्कांसाठी आजही लढा सुरू असून त्याला यश मिळत नाही आणि एकदा वाईट अवस्थेतून पुन्हा मोरबे धरणाच्या पुनर्वसनात घरेदारे उघड्यावर टाकून न्याय मिळाला म्हणून आंदोलनाची भूमिका घेऊन प्रयत्न करीत आहेत.

मोरबे धरणाला ३३ वर्षे पूर्ण झाली आहेत. आजही पुनर्वसन कायदा लागू झाला नाही. मोरबे धरणग्रस्त जनतेचे प्रलंबीत प्रश्न सोडविण्यासाठी म्हणावे तसे प्रयत्न तत्कालिन शासन दरबारी झालेले नाहीत, ३३ वर्षांचे प्रलंबीत प्रश्न सोडविण्यासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा व उपोषणाचा इशारा प्रकल्पग्रस्त जनतेच्या वतीने मोरबे धरण प्रकल्पग्रस्त कृती समितीचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील आणि कार्याध्यक्ष आणि भाजप नेते परशुराम मिरकुटे यांनी दिला होता. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पुनर्वसन उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली २ नोव्हेंबर २०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार तहसिलदार आयुब तांबोळी यांनी नवी मुंबई महानगरपालिका, मोरबे धरण प्रशासन, भूमी अभिलेख, विद्युत मंडळा,तलाठी आणि संबंधीत यांची बैठक त्यांच्या दालनात आयोजित केली होती. धरणासाठी संपादित क्षेत्र,प्रत्यक्ष वापरात असलेले क्षेत्र, शिल्लक क्षेत्र यांचा सर्व्हे करण्यासाठीं लागणारी आवश्यक फी मोरबे धरण प्रशासन भरणार आहे.

पुरविण्यात आलेल्या नागरी सुविधा, द्यावयाच्या सुविधा यांचे सर्वेक्षण तहसील कार्यालय, नवी मुंबई महानगरपालिका, कृती समिती सदस्य व मोरबे धरण प्रशासन हे करणार असून त्यांचा अहवाल पंधरा दिवसांत सादर करण्याचे निर्देश झाले आहेत. पुनर्वसन कायदा लागू करणे व नोकर भरती हे धोरणात्मक निर्णय असल्याने याबाबत नवीन निवेदन सादर करण्यावर एकमत झाले.

याबाबत राज्य सरकारला निवेदन देण्यात येणार आहे. तहसीलदार आयुब तांबोळी यांच्यावर विश्वास ठेवून हे आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आल्याचे कृती समितीच्या वतीने जाहीर करण्यात आले. यावेळी निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, कृती समितीचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष परशुराम मिरकुटे, आदिवासी संघटनेचे अंकुश वाघ, ग्रामपंचायत सदस्य राजू पाटील, विठ्ठल सोनावणे, मधुकर तवले, अभियंता वसंत पडघन, अभियंता मारुती आंबेडकर, कनिष्ठ अभियंता अशोक मोरे, ललित उघले, शंकर मोरे, उप अधिक्षक केंद्रे, मंडळ अधिकारी, तलाठी, निकाळजे, बुवा कदम आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

# अश्वपालकाचा प्रामाणिकपणा; रस्त्यात सापडलेले सोन्याचे दागिने केले परत

**कर्जत : प्रतिनिधी**

पर्यटनासाठी आलेल्या नवविवाहित दाम्पत्याची सोन्याची गंठण रस्त्यावर पडली होती आणि ती तीन तोळे वजनाची गंठण एका अश्वपालकाला सापडली. त्यांनी ते प्रामाणिकपणे दागिने गंठण पोलिसांच्या स्वाधीन केले.

बदलापूर येथील गणेश भानुदास म्हसे हे नवदाम्पत्य माथेरानमध्ये आले होते. सायंकाळी पर्यटनासाठी माथेरान शहरातून फेरफटका मारून वुड साईड हॉटेलवर परतले होते. म्हसे यांच्या पत्नीचे गळ्यात असलेली तीन तोळे वजनाची सोन्याची गंठण पडली असल्याचे त्यांच्या उशिरा लक्षात आले. त्यांनी फिरायला गेले होते तेथे जाऊन पाहणी करून आले आणि तरी देखील त्यांना सोन्याची गंठण काही सापडली नव्हती. त्यामुळे त्यांनी हॉटेल व्यवस्थापकांना भेटून गंठण हरवल्याचे नमूद केले. मात्र हॉटेलमधील त्यांची रूम आणि हॉटेलचा परिसर शोधून देखील गंठण सापडली नव्हती. त्यामुळे गणेश म्हसे यांनी माथेरान पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार देण्याचा निर्णय घेतला होता.

सकाळी माथेरानमधील स्थानिक अश्वपाल संघटना कार्यकर्ता असलेला अश्वपाल बाळू खरात यांनी संघटनेच्या अध्यक्ष आशा कदम यांची भेट घेऊन महात्मा गांधी रस्त्यावर सोन्याची गंठण सापडली असल्याचे सांगत ती गंठण आशा कदम यांना दाखवली. साधारण २ लाख रुपये किमतीची सोन्याची गंठण घेऊन आशा कदम आणि बाळू खरात माथेरान पोलीस ठाण्यात पोहचले. त्यावेळी सहायक पोलीस निरीक्षक शेखर लाव्हे यांनी संबंधीचे सोन्याच्या गंठण बद्दल सोशल मीडियावर माहिती प्रसारित केली. अश्वपाल बाळू खरात यांचा जबाब नोंदवण्याचे काम सुरु असताना ज्यांची गंठण हरवली आहे ते बदलापूर येथील म्हसे हे त्यांच्या पत्नीसह तक्रार देण्यासाठी पोहचले होते. शेवटी खात्री करून पोलीस निरीक्षक शेखर लव्हे आणि अश्वपाल संघटनेच्या अध्यक्ष कदम यांच्या उपस्थितीत त्या दाम्पत्याला त्यांची सोन्याची गंठण परत केली.

# रसायनीमध्ये दोन लाखांचे दागिने प्रवासात चोरीला

**खोपोली : प्रतिनिधी**

पेण ते रिस असा प्रवास करणाऱ्या वैशाली विशाल पाटील (रा.नंददिप सोसायटी, रिस ता. खालापूर) यांच्या बॅगेमधून सोन्याचे गंठण आणि चार तोळ्याचा सोन्याचा हार असा एक लाख ९० हजाराचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. वैशाली यांनी बॅगमधील प्लॅस्टिकच्या डब्यामध्ये दागिने ठेवले होते. अज्ञात चोरट्यांनी पाळत ठेवून बॅगमधील दागिने चोरले.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्या विरुद्ध भा.दं.वि.क.३७९प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई धनाजी काळे हे करीत आहे.

# खोपोलीच्या विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही –आमदार महेंद्र थोरवे

**खोपोली : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या माध्यमातून या मतदारसंघाचा शाश्वत विकास व्हावा यासाठी तुम्हा सर्वांच्या सहकार्यातून या शहराच्या विकासासाठी मी काम करीत आहे, या शहराच्या विकास कामासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही या शहरातील जी जी विकासाची प्रलंबित कामे आहेत, मग ती रस्ता असो, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो, उद्यानाचा प्रश्न, भुयारी गटारी योजना असो ती सर्व कामे पूर्ण करण्याचा आमदार या नात्याने माझा प्रयत्न असणार आहे, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले. गौतम बुद्ध जयंतीचे अवचित साधत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळ्याच्या परिसरात नगर विकास खात्याच्या माध्यमातून ५० लाख रुपयाचे सौंदर्यीकरण कामाचा लोकार्पण सोहळा प्रसंगी उद्घाटक म्हणून आमदार थोरवे बोलत होते.



प्रारंभी आमदार थोरवे यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, राजू गायकवाड, मुख्याधिकारी तथा प्रशासक अनुप दुरे, माजी ज्येष्ठ नगरसेवक मोहन अवसरमल, किशोर पानसरे, अमोल जाधव, कैलास गायकवाड, शिवसेना शहर प्रमुख संदीप पाटील, माजी नगरसेविका केवीना गायकवाड, प्रिया जाधव, शिवसेना शहर पदाधिकारी लक्ष्मण रिठे ,हरेष काळे, दिनेश थोरवे, नगर अभियंता लगाडे, विनय शिपाई, यासह अनेक मान्यवर व शिवसेना पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक माजी नगरसेवक मोहन अवसरमल यांनी केले. माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांनी आपले विचार मांडले.


## जाहीर नोटीस

जाहीर सुचना देण्यात येते की, माझे अशिल मे. विला सिटी बिल्डर्स एलएलपी तर्फे अधिकृत भागीदार श्री. प्रभुलाल खेतशी पटेल यांचा कार्यालयीन पत्ता शॉप नं. १८, शिव चेंबर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर ११, सी बी डी बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे. आणि मे. मेघा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. कानजी अखई पटेल व इतर यांचा कार्यालयीन पत्ता – शॉप नं. १, प्राईम विला, प्लॉट नं. ९९, सेक्टर ४८, द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड यांच्या लाभांत मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील गावठाण विस्तार योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेला खालील परिशिष्टात वर्णन केलेला भुखंड हा दिनांक ०९/०३/२०२२ रोजीच्या नोंदणीकृत त्रिपक्षीय करारनामाव्दारे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. आज रोजी मे. सिडको दप्तरी सदर भुखंडाचा परवानाधारक म्हणून माझ्या अशिलांच्या नावाची नोंद आहे.

**भुखंडाचा तपशिल**

| नोड | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र चौ. मी. मध्ये |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी | २० | ४७ | २४९.९० चौ. मी. |

त्यामुळे माझे अशिलांनी सदर भुखंडावर ''विला बे'' या नावाने प्रकल्प राबविण्याचे ठरविले आहे परंतु सदर भुखंडावर प्रकल्प राबविण्यापुर्वी त्या प्रकल्पाची सविस्तर नोंदणी ''महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण'' यांच्याकडे करणे करीता सदर भुखंडासंदर्भात ''टायटल सर्टिफिकेट'' देणे गरजेचे असते त्यामुळे माझे अशिलांनी मला सदर भुखंडाच्या ''टायटल सर्टिफिकेट'' मिळणेबाबत विचारणा, विनंती केली असल्याने मी सदर भुखंडाचे ''टायटल सर्टिफिकेट'' त्यांस देण्यास मान्यता दिलेली आहे.

परंतु तत्पूर्वी सदर भुखंडासंदर्भात जर कोणाही व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर भुखंडावर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिन भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्टयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत /हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली पत्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे आणि जर तसे केले नाही तर सदर भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनांपासून मुक्त आहे असे गृहित धरुन माझ्याकडून माझ्या अशिलांना सदरहु भुखंड हा चोख व मार्केटेबल आहे असे टायटल सर्टिफिकेट देण्यात येईल आणि मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे,

**सही/–**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल**

पत्ता :– शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे फोन नं. ९६१९५०५९५८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे कोयनावेळे, ता. पनवेल, जि, रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे

**जमिनीचे वर्णन**
**मौजे– कोयनावेळे ता. पनवेल, जि– रायगड**

| भोगवटदाराचे नाव | भूमापन/ सर्व्हे क्र | उपविभाग/ गट क्र | भूधारणा पध्दती | क्षेत्र हे. आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. संतोष जयराम कदम, २) सौ. वनिता जयराम कदम, ३) सौ. सुवर्णा जयराम कदम उर्फ सुवर्णा दिलीप मोरे, ४) सौ. अर्चना श्रीकांत पाटणकर | ६ | ७ | भोगवटादार वर्ग–१ | ०–५२–३० ला.ला<br>०–०२–३० पो.ख | ४.१२ |
| | | | | ०–५४–६० एकूण | |
| | वरील एकूण मिळकतीचे दुसरेपक्षी यांचे ०–१०–९२ हे.आर.पॉ एवढया क्षेत्राचे कायमस्वरूपी विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार. | | | | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०६/०५/२०२३.**

**सही/–**
**ॲड. सतिश बाळाराम गवते**

**पत्ता–** ऑफिस नं. १४, यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. फोन नं. ९१३७५००४५१

## जाहीर निविदा

**ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द, ता. खालापुर, जि. रायगड**

दि. ०६/०५/२०२३

सर्व बांधकाम ठेकेदार व रजिस्टर दुकानदार यांस जाहीर निविदाद्वारे कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत बीडखुर्द ता. खालापूर जि.रायगड यांजकडून ग्रामपंचायत ग्रामनिधी योजनेतून कामाच्या अनुभवी इच्छुक जीएसटी धारक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत त्यांनी आपली निविदा दि. ०६/०५/२०२३ पासून दि. ११/०५/२०२३ पर्यंत ठीक स ११.०० वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावी. व सदर निविदा दि. १२/०५/२०२३ रोजी ठीक स ११.०० वा. मा. सरपंच, सदस्य, ठेकेदार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | बीडखुर्द बौद्धवाडी, बीडखुर्द आदिवासी वाडी, उंबरविरा ठाकूरवाडी यांच्या साठी सार्वजनिक भांडी खरेदी करणे. | ९९५००/– | ग्रामनिधी १५% मागासवर्गीय खर्च सन २०२३/२४ | ९९५/– | ३ महिने |
| २ | केळवली आदिवाशीवाडी, वणी आदिवाशीवाडी, वांगणी आदिवाशीवाडी, वणी बौद्धवाडी यांच्यासाठी सार्वजनिक भांडी खरेदी करणे. | ९९५००/– | ग्रामनिधी १५% मागासवर्गीय खर्च सन २०२३/२४ | ९९५/– | ३ महिने |

**अटी व शर्ती :–**

१. सदर कामाची कोरी निविदा दि.०६/०५/२०२३ पासून दि. ११/०५/२०२३ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२. निविदेसोबत एक टक्का इसारा रक्कम ग्रामपंचायत बीडखुर्द या नावाने डिमांड ड्राफ्ट स्वरूपात भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.
३. निविदा मंजूर झालेल्या ठेकदाराला १०० रुपयाच्या बाँड पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.
४. सदरचे काम पंचायत समितीकडील संबंधित तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली पूर्ण करावयाचे आहे...
५. काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत १ टक्के विक्रीकर २ टक्के आयकर करारावर ०.१५ टक्के सरचार्ज व १ टक्का मंजूर बिमा कामगार इत्यादि रकमा कपात केल्या जातील.
६. ठेकेदार शासकीय रजिस्टर व जीएसटीधारक असणे आवश्यक आहे.
७. सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहून महिन्याने परत केली जाईल.
८. कामाचे वेळी काही जीवितहानी झाल्यास जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९. काम सुरू करण्यापूर्वीचे फोटो काम सुरू असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०. पोस्टाने आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

**सही/–**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत बीडखुर्द**

## निवडक

### रसायनीतील साईबाबा मंदिरात अन्नदान

**मोहोपाडा** : श्री साईबाबा मंदिर मोहोपाडा रसायनी येथे अन्नदान पुन्हा गुरुवार (दि. ४)पासून सुरू करण्यात आले. गेल्या अडीच वर्षापासून कोरोना महामारीमुळे हे अन्नदान बंद करण्यात आले होते. गुरुवारी दुपारी १२ वाजता श्री साईबाबाची आरती करून अन्नदान मान्यवरांच्या हस्ते सुरू झाले. या वेळी साई परिवारातील अध्यक्ष मनोहर मगर, उपाध्यक्ष जयवंत अंबवणे, विलास गवळी, खजिनदार नंदकुमार गोगडे, सेक्रेटरी बि. आय. कागडा, सदस्य मधुकर अंबवणे, कोंटबे, बजरंग दलाचे सदस्य प्रशांत तांबोळी, प्रशांत मोकाशी, बाबू गुडसे, दिनेश पडवळ व इतर साईभक्तांनी प्रसाद सेवेचा लाभ घेतला. या कार्यक्रमात भक्तगणांनी सढळ हस्ते मदत करावी. भक्तांना अन्नदान करायचे असेल त्यांनी मंदिर कमिटी अथवा पुजारी यांच्याकडे अध्यक्ष (९९६०९४०२४४), उपाध्यक्ष (९८५०७५७१२१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल** : पनवेल परिसरातील अनकी हेरिटेज सोसायटीजवळ फॉरेस्ट कॉलनी एटीएमच्या समोर एका व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. या व्यक्तीची उंची पाच फूट चार इंच, डोक्याला टक्कल, चेहरा उभट, अंगात हाफ बाह्याचा फिक्कट लाल टी-शर्ट, त्यावर खिशाला रॉयन इंटरनॅशनल स्कूल असे इंग्रजी भाषेत लिहिलेला शर्ट, ग्रे रंगाची फुल पॅन्ट असा पेहेराव आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोहवा एच. जी. आहिरे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### महिलेचे दीड लाखांचे दागिने लांबविले

**पनवेल** : येथे राहणाऱ्या ६५ वर्षांच्या ज्येष्ठ नागरिक महिलेला दोन भामट्यांनी फसविले आहे. या महिलेकडील दीड लाख रुपये किमतीचे दागिने पळवून हे भामटे पसार झाले आहेत. येथे राहणारी वृद्ध महिला सकाळी मसाला व भाजीपाला आणण्यासाठी मार्केटमध्ये गेली होती. शनेश्वर इमारतीजवळ एक व्यक्ती त्यांना भेटली. आमच्या शेठला मुलगा झाला आहे. तो नागरिकांना भेटवस्तू वाटत आहे. तुम्हीही चला, असे सांगितले. या व्यक्तीवर विश्वास ठेवून त्यांच्यासोबत गेलेल्या महिलेला दुसऱ्या एका व्यक्तीने तुमच्याकडील दागिने काढून ठेवा, असे सांगितले. महिलेने ९० हजार रुपये किमतीच्या बांगड्या व ६० हजार रुपये किमतीचे इतर दागिने असे एकूण दीड लाख रुपये किमतीचे दागिने घेऊन पलायन केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

# सायन्स पार्कच्या कामाला गती द्यावी

## पाहणीदरम्यान नवी मुंबई आयुक्तांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहराचे आणखी एक आकर्षण केंद्र होणाऱ्या सायन्स पार्कच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करताना आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सध्या सुरू असलेल्या कामाला अधिक गती देऊन दिलेल्या मुदतीमध्ये आगामी वर्षभराच्या कालावधीत बांधकाम पूर्ण करण्याचे निर्देश अभियांत्रिकी विभागाला दिले. या वेळी शहर अभियंता संजय देसाई, अतिरिक्त आयुक्त शिरीष आरदवाड, कार्यकारी अभियंता गिरीश गुमास्ते व सुनील लाड आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

सध्याच्या माहिती तंत्रज्ञान युगाला साजेसा व विद्यार्थ्यांच्या ज्ञानात विलक्षण भर घालणारा सायन्स पार्क हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प महापालिकेच्या वतीने वंडर्स पार्कजवळ उभारला जात आहे. यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञानाशी संबंधित अद्ययावत मॉडेल्स, प्रोजेक्ट्स, इमेजेस, ऑडियो व्हिज्युअल फिल्म्स अशा अत्याधुनिक साधनांचा वापर केला जाणार आहे. विशेषत्वाने लहान व कुमारवयीन मुले आणि युवकांकरिता माहिती व ज्ञानाचा खजिना खुला केला जाणार असून 'हसत खेळत विज्ञान' ही संकल्पना प्रभावीपणे राबविली जाणार आहे.



सायन्स पार्कचे बांधकाम सुरू असतानाच त्याठिकाणी उपलब्ध करून द्यावयाच्या प्रदर्शनीमधील साहित्य, उपकरणे व इतर बाबींची उपलब्धता करून घेण्याबाबतच्या अंदाजपत्रक मंजूरीची कार्यवाहीदेखील सुरू करावी व या दोन्ही गोष्टी समांतर रितीने पूर्ण होतील याकडे लक्ष देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

सायन्स पार्क पाहण्यासाठी शाळांच्या सहली येऊ शकतील. हे लक्षात घेऊन शाळांच्या व इतर बसेसची पार्कींग व्यवस्था पुरेशी ठेवण्याबाबतही आताच नियोजन करावे असेही आयुक्तांनी निर्देश दिले. सायन्स पार्कला भेट देणारे पर्यटक शेजारील वंडर्स पार्कलाही भेट देतीलच हे लक्षात घेऊन या दोन्हींचा समन्वय राखून पर्यटन स्थळ विकसनाच्या दृष्टीने संयुक्त विचार व्हावा व तशा प्रकारचे नियोजन करावे अशाही सूचना आयुक्तांमार्फत अभियांत्रिकी विभागास देण्यात आल्या.

### कामाचा दर्जा राखावा

सद्य स्थितीत पहिल्या मजल्यावरचे ७० टक्के काम पूर्ण झाले असून दुसऱ्या मजल्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. या संपूर्ण कामाची प्रत्यक्ष जागी जाऊन पाहणी करीत व त्यांचे नकाशे पाहून नियोजनाविषयी बारकाईने माहिती घेत आयुक्त राजेश नार्वेकर यांनी कामाचा दर्जा राखून गती द्यावी, असे निर्देश दिले.

# नवी मुंबईत सीबीएसई शाळांची सोडत

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना देखील गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने सीबीएसई शाळा सुरू केली होती. इतर खासगी शाळांच्या भरमसाठ फी भरून शिक्षण आवाक्या बाहेरचे असलेल्या पालकांना मात्र ही महापालिकेची सीबीएसई शाळा पसंतीस उतरत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस याला प्रतिसाद वाढत आहे. यंदा नर्सरीच्या २४० प्रवेशासाठी एकूण एक हजार ११४ अर्ज दाखल झाले होते. सकाळी १० ते १ वाजेपर्यंत ही सोडत सुरू होती.




यावर्षी प्रवेश घेण्यासाठी २५मार्च पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. कोपरखैरणे येथील शाळा क्रमांक ९४मध्ये ६७३ अर्ज दाखल झाले असून ५२१ पात्र ठरले आहेत, तर सीवूडस शाळा क्रमांक ९३मध्ये ४४२ अर्ज प्राप्त झाले असून ४१४ अर्ज पात्र ठरले. यापैकी २४० जागांसाठी लॉटरीच्या माध्यमातून निवड करण्यात येणार होती. कोपरखैरणे येथील शाळा क्रमांक ९४ तसेच नेरूळ येथील शाळा क्रमांक ९३ याकरिता प्रत्येकी १२० जागांची सोडत व्यवस्थित पार पडली आहे.

नेरुळ येथील शाळेतील एक किमीच्यानुसार १०४ विद्यार्थी पात्र ठरले असून त्यांना आधी प्राधान्य देऊन सोडत काढली, तर कोपरखैरणे येथील शाळेत एक किमी परिघातील ७०, तर दोन किमीतील ३० आणि तीन किमी परिसरातील २० विद्यार्थ्यांना निवडून सोडत काढण्यात आली.

# सायन-पनवेल महामार्गावरील पादचारी पुलाचे काम पूर्ण करण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सायन-पनवेल महामार्गावर तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोरील पादचारी पुलाचे काम महामार्गाच्या रुंदीकरणासाठी अर्धवट ठेवण्यात आले आहे. रहिवाशांना जीव मुठीत घेऊन वर्दळीचा सायन-पनवेल महामार्ग ओलांडण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या पादचारी पुलाचे काम पूर्ण करण्याची मागणी होत आहे.



सायन-पनवेल महामार्गावर २०१०च्या सुमारास सानपाडा व तुर्भे दोन विभागांना जोडणारा पादचारी पूल उभारण्यात आला. या पुलाच्या बांधकामास अंदाजे २५ लाखांहून अधिकचा खर्च आला होता. या पुलामुळे मोठ्या प्रमाणात रहदारी असलेल्या सायन-पनवेल महामार्गावर रस्ता ओलांडताना पादचाऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती, तसेच रस्ता ओलांडताना होणाऱ्या अपघातांवरही नियंत्रण मिळवता येईल, असा दावा सार्वजनिक बांधकाम विभागाने केला होता, मात्र हा पूल सध्या अर्धवट असल्याने आजही नागरिकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे.

सद्य स्थितीत मनपा हद्दीतील सायन-पनवेल महामार्ग देखभाल, दुरुस्तीसाठी नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरित झाला आहे. त्यामुळे पादचाऱ्यांच्या जिवाशी होणारा संभाव्य धोका पाहता या पुलाचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.

# बेलापूर येथे नरेंद्र मोदी फॅन्स क्लबचे उद्घाटन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारताच्या पंतप्रधानांनी जारी केलेल्या विविध सरकारी योजना आणि धोरणांबद्दल सामाजिक जागरूकता पसरविण्याच्या उद्देशाने नरेंद्र मोदी इंटरनॅशनल फॅन्स क्लबची स्थापना झाली. या नरेंद्र मोदी इंटरनॅशनल फॅन्स क्लबचे उद्घाटन बुधवारी (दि. ३) आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते सीबीडी-बेलापूर येथे करण्यात आले.

या वेळी एनजीओचे अध्यक्ष जितेंद्र तवरमलानी, विशाल दत्त, उषा दत्त, एनजीओच्या सल्लागार समितीच्या संयुक्त प्रमुख निलम चावला, सल्लागार समितीच्या सहप्रमुख कविता हंडिक, आरपीआय अध्यक्षा शीला बोदाडे, वरिष्ठ नेते रमेश बोदाडे आणि भाजपचे विविध वरिष्ठ नेते उपस्थित होते.

# बुद्ध प्रतिष्ठान स्मरणिकेचे प्रकाशन

**नवी मुंबई : बातमीदार**

बुद्ध प्रतिष्ठान, वाशी नवी मुंबई या संस्थेतर्फे तथागत भगवान गौतम बुद्धपौर्णिमा व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३२वा संयुक्त जयंती उत्सव साजरा करण्यात आला. या वेळी गौतम बुद्धांची भव्य मूर्तीची प्रतिष्ठापना हि करण्यात आली व सर्व मान्यवरांच्या हस्ते बुद्ध प्रतिष्ठान स्मरणिका २०२३च्या पुस्तकाचे प्रकाशन केले.

आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, गौतमबुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समस्त मानवतावादी दृष्टीकोन ठेऊन जीवन जगायला हवे. यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी व बुद्ध प्रतिष्ठान कार्यकरणी यांना शुभेच्छा दिल्या.

या वेळी राष्ट्रीय अध्यक्ष भीमराव आंबेडकर, रामविलास बर्वे, अध्यक्ष डॉ. अनंत हर्षवर्धन, उपाध्यक्ष हनुमंत दैने, उपाध्यक्ष राजू कांबळे, माजी नगरसेविका तथा माजी सभापती शुभांगी पाटील, माजी विरोधीपक्ष नेते दशरथ भगत, माजी नगरसेविका अंजली वाळूंज, विकास सोरटे, राजू शिंदे, विजय वाळूंज व इतर मान्यवर उपस्थित होते.





**पनवेल : भाजप अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष हाजी एजाज देशमुख यांची भाजप प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे. याबद्दल अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, आदिल पटेल, प्रदेश सचिव अब्दुल नासेर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# युलू बाईकची दूरवस्था; वापर करून अडगळीत

**नवी मुंबई** : शहर प्रदुषणमुक्त व पर्यावरणशील राहण्यासाठी सायकल अथवा ई-बाईकचा वापर करावा या अनुषंगाने शहरात ई-बाईक सुरू करण्यात आलेली आहे, मात्र ही ई-बाईक सध्या वापरून अडगळीत टाकण्याचे प्रकार घडत आहे. महापे येथे युलू बाईक वापरून बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी टाकून दिली आहे. अनेकांना या ई-बाईक उपयुक्त ठरत असतानाच, दुसरीकडे त्यांचा चुकीच्या पद्धतीने होणारा वापरदेखील समोर येत आहे. महापे येथे कोणी अज्ञात व्यक्तीने वापर करून नाल्याचे बांधकाम सुरू आहे त्याठिकाणी टाकून दिली आहे. नवी मुंबई महापालिकेडून असे गैरवापर करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.

# 'हापूस'ची चव झाली आंबट

## उत्पादनात मोठी घट; ग्राहकांचा इतर जातीच्या आंब्यांकडे कल

**नवी मुंबई : बातमीदार**

गेल्या काही महिन्यांपासून वातावरणात सातत्याने होणारे बदल यामुळे हापूस आंब्याची चव आंबट झाली आहे. यंदा अवघे १६ ते २८ टक्के उत्पादन असून मागील सहा वर्षांच्या तुलनेत यंदा सर्वांत कमी उत्पादन आहे. त्यामुळे दर वाढले असून ग्राहकांनी इतर जातीच्या आंब्यांकडे आपला मोर्चा वळविला आहे.



एपीएमसीत फळ बाजारात एप्रिल-मे महिन्यांत मोठ्या प्रमाणावर कोकणातील हापूस दाखल होण्यास सुरुवात होते, परंतु यंदा उलट परिस्तिथी असून ऐन हंगामात केवळ १८ हजार ते २० हजार पेट्या दाखल होत आहेत. कोकणात दोन ते तीन वेळा मोहोर आला यामुळे फळधारणा झाली नाही. मोहोर संवर्धानात अडथळा व त्याचवेळी वातावरणात झालेल्या बदलांमुळे किडरोगांचा प्रादूर्भाव या सर्वांचा परिणाम हापूस आंब्याचे उत्पादन घटण्यावर झाला. मार्चमध्ये अवकाळी पावसाच्या भीतीने वेळेआधीच आंबे तोडणी केल्यामुळे, कोकणातील सर्वच विभागातून एकाच वेळी हापूस दाखल झाल्याने मार्चमध्ये तीन-चार पटीने आवक वाढली.

अवकाळी पावसाने आंबेगळही झाली असल्याने मे महिन्यांत कमी प्रमाणात हापूस दाखल होत आहे.

रायगडमधील आंब्याची झाडे तीन वर्षांपूर्वी आलेल्या निसर्ग चक्रीवादळाने जमिनदोस्त झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी संकटाचा सामना करावा लागत आहे. कारण वादळामुळे अनेक झाडेही कमजोर बनली आहेत. १५ मेनंतर बाजारात हापूस आवक वाढेल, मात्र मागील वर्षीच्या तुलनेत प्रमाण कमीच असेल.

एपीएमसी बाजारात सध्या हापूस कमी प्रमाणात दाखल होत आहे. उर्वरित उत्पादनाला उभारी देण्यासाठी बागयतदार यांच्याकडून औषध फवारणीसाठी अधिक खर्च केला जात आहे. १५ मेनंतर रायगड जिल्ह्यात दुसऱ्या भराचा आंबा मंडईत दाखल होईल, मात्र एपीएमसीत येणाऱ्या हापूसला अपेक्षित दर मिळेल का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

> **अवकाळी पावसाने मोठा फटाका बसला आहे. साधारण मार्च महिन्यात ६० ते ७० हजार, एप्रिल मध्ये ८० ते ९० हजार तर मे महिन्यात एक लाखांपेक्षा जास्त पेट्यांची आवक होत असते. यंदा मार्च महिन्यात आवक योग्य राहिली, मात्र आता उतरती कळा लागली आहे. फक्त १५ हजार पेट्या बाजारात आल्या आहेत. त्यामुळे यंदा ग्राहकांना हापूसची गोडी चाखता येणे शक्य नाही. पुढील वर्षी हे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे.**
> **-किरण चिखले,**
> **आंबे व्यापारी, एपीएमसी**

# गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान जगासाठी प्रेरक -अर्जुन डांगळे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान आधुनिक युगातही महत्त्वाचे असल्यामुळे ते जगाला प्रेरक आहे, अशी भावना विख्यात दलित साहित्यिक अर्जुन डांगळे यांनी व्यक्त केली. तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.



डांगळे म्हणाले, जगातील सध्याची आव्हाने, पर्यावरणाचा ऱ्हास, प्रदूषण, मानवी संहर आणि युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीला सुनियंत्रित करण्यासाठी बुद्धांचे तत्त्वज्ञानच प्रभावी आहे, असा विश्वासही डांगळे यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी, बुद्ध जगाला सुखकारक आहे. त्याचा धम्म आणि संघ आजच्या काळाची गरज आहे. भगवान बुद्धाच्या नंतर सम्राट अशोक यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाला वैभवाच्या शिखरावर नेले होते. तेच वैभव आता पुन्हा प्राप्त करण्याच्या हेतूने बुद्धाला डॉ. आंबेडकर यांनी स्वीकारले आहे. बुद्ध धम्माची वैभवशाली पताका फडकविण्यात ब्राम्हण कुलीनांचा मोठा वाटा होता. भविष्यात ब्राम्हण कुलीनांनी बौद्ध धम्माचे प्रचार आणि प्रसार करण्यात योगदान दिले पाहिजे, असे आवाहन डोंगरगावकर यांनी केले.

प्राचार्य नेहा राणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. तळोजे येथील रायगड महाविहारात आणि सीबीडी बेलापूर येथील सम्राट अशोक महावीरातही बुद्धजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# खोपोलीत मान्सूनपूर्व कामांना मुहूर्त मिळेना!

## शहरातील नाले, गटारे कचऱ्याने भरली

**खोपोली : प्रतिनिधी**

दरवर्षी खोपोली पालिकेकडून मे महिन्यात पहिल्या आठवड्यापासून टप्याटप्याने संपूर्ण शहरात मान्सूनपूर्व कामे अंतर्गत साफसफाई व अन्य अत्यावश्यक कामांना सुरुवात केली जाते. यावर्षी मात्र कोणत्याही प्रभागात मान्सून पूर्व कामांना सुरुवात झालेली नसल्याने नागरिकांत व आजी माजी लोकप्रतिनिधीमध्ये आश्चर्य व्यक्त केले जात आहे .






पावसाळयात पूर स्थिती, रहिवासी भागात पाणी साचून नुकसान टाळण्यासाठी येथील नाले व गटारींची मान्सून पूर्व साफसफाई आवश्यक आहे. दरवर्षी आशा प्रकारे मान्सूनपूर्व कामे युद्ध पातळीवर केली जातात. यावर्षी मात्र अद्याप या कामांना मुहूर्त मिळालेला नाही. दीड वर्षांहून अधिक काळापासून खोपोली शहरातील सर्व प्रमुख नाले व विविध रहिवासी भागातील गटारी गवत, झाडाझुडुपे, कचरा, गाळ, प्लास्टिकने भरलेल्या आहेत. आगामी पावसाळ्यापूर्वी या गटारी, नाल्यांची साफसफाई पूर्णत्वास न गेल्यास पाणी निचरा होण्यास प्रचंड अडसर निर्माण होऊन अनेक रहिवासी भागात पाणी भरण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच दरडग्रस्त डोंगर व त्या खालील रहिवासी भागाची पहाणी करून संभाव्य धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना ही दरवर्षी केल्या जातात. याही संदर्भात अंधार असल्याचे स्पष्ट होत असल्याने नागरिक व आजी माजी नगरसेवकांत नाराजी व्यक्त केली जात आहे.

वातावरणात मान्सूनचा रंग गडद बनत आहे. मागील दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण बनले असून मान्सून पूर्व पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. अशात नालेसफाई व अन्य मान्सून पूर्व कामे रखडल्यास याचा परिणाम पूरस्थितीत होण्याची शक्यता असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**प्रशासनाचे दुर्लक्ष**

***खोपोली पालिकेतील लोकप्रतिनिधीची मुदत संपल्याने संपूर्ण कारभार प्रशासनाकडे आहे. मुख्याधिकारी अ नुप दुरे-पाटील हेच मुख्याधिकारी व मुख्य प्रशासक म्हणून कार्यरत आहेत. लोकप्रतिनिधीचा कोणताही वचक प्रशासनावर राहिला नसल्याने, वार्ड व प्रभागातील समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे विविध मूलभूत सुविधा, मान्सूनपूर्व कामांकडे दुर्लक्ष होत असल्याचे अधिकारीही खासगीत सांगत आहेत.***

# रोठ बुद्रुकच्या भवानी मंदिराचा जीर्णोद्धार



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ बुद्रुक येथे येथे श्री क्षेत्र भवानी मंदिरामध्ये बुधवारी मंदिर जीर्णोद्धार मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कळस सोहळा धार्मिक वातावरणमध्ये साजरा झाला.

तीन दिवस रोठ बुद्रुक गावामध्ये चोहो बाजूस भक्तिमय वातावरण होते. सोमवारी ग्रामस्थ व भक्तांसोबत पारंपारिक वाद्यासह श्री भवानी मातेची मूर्ती व अन्य देवतांच्या मूर्तींची ग्रामप्रक्षिणा व मिरवणूक काढली. मंगळवारी भूपाळ्या, काकड आरती, वास्तुशुध्यर्श, नवीन नवीन मूर्तींची धन्याधिवास, कोकण मराठी साहित्य परिषद कवी संमेलन आयोजिले होते. मुख्यदिवशी बुधवारी पहाटे ५ वा. भुपाळ्या व काकड आरती, ६ वा. मूर्तीवर अभिषेक, ७ ते १० वा.होम हवन,१०.३० वा. मूर्तीची प्राणप्रतिष्ठा,११ वा. श्री सत्यनारायणाची महापूजा, १२.३० वा. आरती व महाप्रसाद, सा. ५ वा. दानशूर देनगिदारांचे सत्कार, ७ ते ८ वाजेपर्यंत हरिपाठ, रात्री ९.३० वाजता बालाजी महाराज मोहिते यांचे कीर्तन ठेवण्यात आले होते.

आमदार महेंद्र शेठ दळवी, माजी आमदार धैर्यशील पाटील, दक्षिण रायगड भाजपा जिल्हाध्यक्ष राजेश मापारा, राष्ट्रवादी रोहा तालुका अध्यक्ष विनोद भाऊ पाशिलकर, जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, शिवसेना उपजिल्हा प्रमुख प्रशांत मिसाळ, रोहा तालुका प्रमुख मनोज कुमार शिंदे, शिवसेना रोहा तालुका प्रमुख ठाकरे गट समीर शेडंगे, युवा मोर्चा रोहा तालुका अध्यक्ष महेश मोहिते, भाजपा रोहा तालुका सरचिटणीस संजय लोटणकर यांनी भवानी मातेचे दर्शन घेतले.

# खालापूर वावंढळ येथे गणेश घाटाचे भूमिपूजन

**आमदार महेश बालदी यांच्या निधीतून काम**



**चौक : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीतून वावंढळ येथे गणेश घाट व सुशोभीकरण कामाची सुरूवात चौक ग्रामपंचायत सरपंच रितु ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आली. खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायत वावंढळ हद्दीतील वावंढळवाडी येथे भिलवले धरणाची उपनदी धावरी ही वाहत जाते. मात्र अनेक वर्षे मागणी करून सुद्धा गणेश घाट व सुशोभीकरण काम होत नव्हते, पर्यावरण प्रेमी व अपघात ग्रस्त मदतनीस रामदास काईनकर, प्रदीप जाधव यांनी शासकिय दरबारी प्रयत्न करून आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधीतून गणेश घाट बांधण्यास मंजुरी करून घेतली. घाट काम झाल्यावर गणपती बाप्पा यांना निरोप देण्याचे व कपडे धुण्यासाठी याचा कायमस्वरुपी उपयोग होईल.

यावेळी उपसरपंच अमोल कदम, ग्रामपंचायत सदस्य ललिता काईनकर, माजी सरपंच संध्या निकम,प्रदीप जाधव, किसन पवार, रोहित पंदेकर,सचिन कांबळे, कमलाकर काईनकर, दिपक पंदेकर, भारती महाडिक, रोशन पंदेकर, रामदास काईनकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. आमदार महेश बालदी यांनी ग्रामपंचायत ला आणखी विकास कामांसाठी निधी मंजुर करून दिला आहे, त्यांचे विशेष आभार ग्रामस्थानी व्यक्त केले आहेत.

# मुरुड शहराच्या प्रवेशद्वारावर आकर्षक कमान बसवण्याची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड शहराचा सर्वांगीण विकास होत आहे. प्रत्येक पाखाडीमधील सर्व रस्ते मजबूत व टिकाऊ करण्यात आले आहेत. शहराचा विकास होत असताना मुरुडमध्ये असंख्य पर्यटक शहरातील ज्या प्रवेश द्वाराने शहरात येतात. त्याठिकाणी आकर्षक कमान बनवावी म्हणजे शहराच्या वैभवात भर पडेल यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी आकर्षक कमानी बनवाव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते व पद्मदुर्ग व्यवसायिक संघटनेचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी केली आहे.

गायकर यांनी एकदरा पूल, दस्तुरी नाका,तसेच कर वसुली नाका अशी तीन प्रवेशद्वार असून या तीन ठिकाणी आकर्षक कमानी बसून पर्यटकांचे हार्दिक स्वागत करावे अशी सूचना यावेळी त्यांनी केली आहे. शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच कमानी सुद्धा आकर्षक बनवण्यात येऊन शहराची सुंदरता वाढवावी अशी मागणी या वेळी त्यांनी केली आहे.





(छाया : श्यामकांत नेरपगार)

**नागोठणे : येथील वैदेही जोशी न्यूज पेपर एजन्सीचे मालक राजेंद्र जोशी यांची सुकन्या वैदेही व रोहा तालुक्यातील भातसई येथील शिवसेनेचे युवा नेते धीरज नरेश खरिवले यांच्या विवाह संगी वधू-वरास आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित आमदार महेंद्र दळवी व सहकारी, जोगेश्वरी देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव दिलीप टके व मित्रमंडळ. सोबत राजेंद्र जोशी, संतोष जोशी.**

## निवडक

### वावळोलीत विकासकामांचे भूमिपूजन



**सुधागड :** सुधागड तालुक्यातील वावळोली गावातील विविध विकास कामांचे भूमिपूजन गुरुवारी (दि.४) भाजप राज्य कार्यकारणी सदस्य राजेश मपारा यांच्या हस्ते करण्यात आले. या विकास कामांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना, वावळोली गावातील मुख्य रस्ता, गणपती विसर्जन घाटाकडे जाणारा रस्ता व नाल्यावरील बंधारा या कामांचा समावेश आहे. येथील पाणीपुरवठा योजना लागणार मार्गी लागल्यावर पाणी प्रश्न मिटणार आहे. शिवाय इतर विकास कामांमुळे गावातील ग्रामस्थांची गैरसोय थांबणार आहे. यावेळी भाजप सुधागड तालुका सरचिटणीस शिरीष सकपाळ, ताराबाई सकपाळ, निलेश शिर्के, पोलीस पाटील महाले, शरद किंजावडे आदी मान्यवर, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### विजय मेथा, सुभाष दळवींचा सन्मान



**माणगाव :** धनंजय राईस मिलचे मालक विजय चुनीलाल मेथा आणि रोहा तालुक्यातील वरसे गावचे सुपुत्र व कर्मभूमी माणगाव असलेले तरुण उद्योजक सुभाष बापूसाहेब दळवी यांना अविष्कार फाऊंडेशन इंडिया महाराष्ट्र राज्य या सेवाभावी संस्थेतर्फे महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार २०२३ने रविवारी जोतिबा रॉयल रिसॉर्ट, श्री क्षेत्र जोतिबा (वाडी- रत्नागिरी) ता. पन्हाळा जि. कोल्हापूर या ठिकाणी झालेल्या अशा कार्यक्रमात विशेष अतिथी शिक्षक आमदार पुणे विभाग- कोल्हापूर प्रा. जयंत आसगावकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास जेष्ठ साहित्यिक सीतायनकार प्रा. किसनराव कुराडे, अविष्कार फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार, उद्योजक संजय भगत, कोडोली पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शीतलकुमार डोईजड, लेखक तथा कवी अरविंद मानकर, पत्रकार निवास मोटे, कोल्हापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे संचालक सुरेश उगारे, अविष्कार फाउंडेशन दक्षिण भारत विभागीय अध्यक्ष उज्वला सातपुते, अविष्कार फाउंडेशनचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष दत्तात्रय सूर्यवंशी, अविष्कार फाउंडेशनचे पन्हाळा तालुका अध्यक्ष शशिकांत म्हेत्तर आदी उपस्थित होते.

# विश्वकर्मा समाजाच्या हितासाठी काम करणार : राजकुमार विश्वकर्मा

**रोहे : प्रतिनिधी**

छेदीलाल विश्वकर्मा, राम प्यारे लाल विश्वकर्मा यांच्या आशीर्वादामुळे सौरभ विश्वकर्मा व विश्वकर्मा आर्मीचे राष्ट्रीय अध्यक्ष चंदन विश्वकर्मा यांच्या कुशल नेतृत्वाखाली महाराष्ट्रात विश्वकर्मा समाजाच्या हितासाठी आपण काम करणारा असून बुधवारी रायगड येथे महाराष्ट्र कार्यालयाचे उद्घाटन होत असल्याने आम्हाला आनंद होत आहे. या कार्यालयातूनच महाराष्ट्रात विश्वकर्मा आर्मीचे संघटना बांधण्याचे काम करणार असल्याचे विश्वकर्मा आर्मी महाराष्ट्र कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी विश्वकर्मा आर्मी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजकुमार विश्वकर्मा यांनी रोहा येथे व्यक्त केले. विश्वकर्मा आर्मी महाराष्ट्र प्रदेश कार्यालयचे उद्घाटन निवास सातांबेकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र प्रभारी सचिन विश्वकर्मा, महाराष्ट्र मीडिया प्रभारी गणेश कुमार विश्वकर्मा, छत्रपति संभाजी नगर जिल्हा अध्यक्ष अशोक विश्वकर्मा, रायगड जिल्हा उपाध्यक्ष बसंत विश्वकर्मा, मंत्री बृजलाल विश्वकर्मा, मुनेश्वर वर्मा, कोषाअध्यक्ष संतोष विश्वकर्मा, रोहा तालुका अध्यक्ष धीरज विश्वकर्मा, तालुका उपाध्यक्ष हरीश विश्वकर्मा, नीरज विश्वकर्मा, माजी अध्यक्ष महेश नगांवकर, भरत सातांबेकर, इंद्रजीत शर्मा, राम लवत विश्वकर्मा, ब्रीजेश विश्वकर्मा, शिवकुमार लोधी, रमेश कुशवाह आदी उपस्थित होते.



# मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे येथील धोकादायक स्ट्रक्चरमुळे अपघाताची भीती

**नागोठणे : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील ८ ते १० वर्षांपूर्वी उभारलेले सिमेंटचे स्ट्रक्चर आता धोकादायक अवस्थेत आहेत. हे स्ट्रक्चर कधी कोसळून अपघात होईल याची शाश्वती नाही. त्यामुळे धोकादायक स्ट्रक्चर जवळून जाणाऱ्या वाहनचालक आणि स्थानिक ग्रामस्थांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.



मुंबई-गोवा महामार्गाचे काम गेल्या ८-१० वर्षांपासून रखडले आहे. महामार्गासाठी बऱ्याच ठिकाणी सिमेंटचे स्ट्रक्चर उभे करण्यात आले आहेत. वडखळ ते नागोठणे दरम्यान अधिक स्ट्रक्चर आहेत. ऊन ,पावसामुळे हे स्ट्रक्चर जीर्ण झाले आहेत. काही स्ट्रक्चर तर काळवंडले असून कोसळण्याची भीती आहे. तर काही स्ट्रक्चर जवळ रेती,विटा,खडी मोठया प्रमाणात अस्तव्यस्त पडल्या आहेत. काही स्ट्रक्चर मधील लोखंडी सळ्या बाहेर आल्या असून त्या तश्याच ठेवण्यात आल्या आहेत. त्या लागून देखील दुखापत होण्याची शक्यता आहे.

पनवेल ते इंदापूरदरम्यान ८ ते १० स्ट्रक्चर आहेत. महामार्गावर उड्डाणपूल तर काही ठिकाणी अंडरपाससाठी हे स्ट्रक्चर उभारण्यात आले आहेत.सध्या रस्त्याचे काम बंद असले तरी जेथे हे धोकादायक स्ट्रक्चर उभे आहेत तेथे कोणत्याही प्रकारचे सूचना फलक नाहीत. जेथे लोखंडी सळ्या बाहेर पडल्या आहेत तेथे बॅरिकेड्स ही नाहीत. बऱ्याच स्ट्रक्चर जवळ रस्ता ओबडधोबड आहे,काही ठिकाणी मोठे खड्डे ही पडले आहेत मात्र अशा ठिकाणी देखील सूचना फलक लावलेले नाहीत.ज्या ठिकाणी रस्ता मध्ये संपतो अशा ठिकाणी डायव्हर्शन बोर्ड देखील नाही.

महामार्गाची आताची परिस्थिती बिकट असून जीवघेणा प्रवास करावा लागतो. खड्डे आणि रस्त्यामधील स्ट्रक्चरवर अनेक वाहन धडकत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले आहे. याशिवाय वाहनांमध्ये बिघाड होतो आहे ते निराळे.मात्र यामुळे प्रवाश्यांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

**महामार्गवर उभ्याकेलेल्या या स्ट्रक्चरमुळे आघात होण्याची दाट शक्यता आहे,नागोठणे स्टेट बँक समोर अशाच पद्धतीचे स्ट्रक्चर उभे करून ठेवले आहे त्याच्या लोखंडी शिगा थेट रोडवर आल्या आहेत, याला आदळून जिवीत हानी होण्याची दाट शक्यता आहे या संदर्भात आम्ही स्थानिक ग्रामपंचायतला अर्जदेखील देत आहोत.**

**-विलास भावसार, स्थानिक नागरिक, नागोठणे**

**आम्ही स्ट्रक्चरच्या परिसरातली साफसफाई करून घेऊ व नवीन ठेकेदार आल्यानंतर आम्ही लवकरच आमचे पुढील काम सुरू करू व या स्ट्रक्चरमुळे कोणतीही जीवित हानी होणार नाही याची आम्ही काळजी घेऊ.**

**-यशवंत घोटकर, प्रकल्प संचालक, मुंबई-गोवा महामार्ग पळस्पे ते इंदापूर**

# यशवंतखार येथील योग शिबिराला प्रतिसाद

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा प्रशासन, केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय अहमदनगर, जिल्हा क्रीडा अधिकारी, नेहरू युवा केंद्र, स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्था रोहा आणि इतर संस्था यांच्या विद्यमाने तालुक्यातील सानेगाव-यशवंतखार येथे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली योगाभ्यासाचे शिबीर आयोजित केले होते.



यशवंतखार गावातून योग प्रचाराच्या उद्देशाने प्रभात फेरी काढण्यात आली. अंबिका कुटीर संस्थेचे योगाभ्यासक श्री. पवार आणि श्रीमती पवार यांनी योगाभ्यासाचे महत्व विषद करून योगासने आणि प्राणायामचे प्रात्यक्षिक दाखविले. ग्रामस्थांकडून करवूनही घेतले. राष्ट्रीय युवा पुरस्कार विजेत्या तपस्वी गोंधळी व सुचिता साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या संस्थेच्या विद्यार्थी युवकांनी योगाचे महत्व विषयावर पथनाट्य सादर केले. याप्रसंगी विविध पारंपरिक खेळांचे आयोजन केले होते. खेळातील विजयी ग्रामस्थांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाकरिता केंद्रीय संचार ब्यूरो, क्षेत्रीय कार्यालय अहमदनगरचे श्री. फनिकुमार, नेहरू युवा केंद्र अलिबागचे समन्वयक निशांत रौतेला, सरपंच स्वप्नाली भोईर आदी उपस्थित होते.

# चोरीस गेलेला मुद्देमाल परत

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दोन चोरीच्या घटना झाल्या होत्या. त्याचा तपास कर्जत पोलिसांनी केला व आरोपींना पकडून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त केला. हा जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादींना परत देण्यात आला. हा मुद्देमाल एक लाख ६८ हजार रुपये किंमतीचा होता.



अभिनव ज्ञान मंदिर परिसरात राहणाऱ्या शिवा संतराम दुबे हे घराला कुलूप लावून बाहेर गेले असताना दुपारच्या सुमारास चोरट्यांनी बंद घराचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश केला व १ लाख ७५ हजार १४० रुपये किंमतीचा मुद्देमाल लंपास केला. यामध्ये रोख रक्कम व सोने चांदीच्या दागिन्यांचा समावेश होता. याबाबत दुबे यांनी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे व पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीस अटक केली.

# कोलकाताचा हैदराबादवर थरारक विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुरुवारी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने सनरायझर्स हैदराबादवर पाच धावांनी रोमांचक विजय मिळवला. कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत नऊ गडी गमावून १७१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात सनरायझर्स संघ २० षटकांत आठ गडी गमावून १६६ धावा करू शकला. अखेरच्या षटकात कोलकाताच्या वरुण चक्रवर्तीने हैदराबादच्या फलंदाजांना रोखले.

## वरुण चक्रवर्तीचे जादुई षटक



कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध सनरायझर्स हैदराबादला शेवटच्या षटकात नऊ धावा करायच्या होत्या. अशा स्थितीत नितीश राणाने फिरकीपटू वरुण चक्रवर्तीला गोलंदाजीसाठी बोलावले. त्याच्यासमोर अब्दुल समद आणि भुवनेश्वर कुमार हे स्फोटक फलंदाज होते. वरुणने पहिल्या दोन चेंडूंवर दोन धावा दिल्या. तिसऱ्या चेंडूवर त्याने अब्दुल समदला अनुकुल रॉयकरवी झेलबाद केले. मयंक मार्कंडे समद बाद झाल्यानंतर क्रीजवर आला. चौथ्या चेंडूवर त्याला एकही धाव करता आली नाही. पाचव्या चेंडूवर त्याने एकच धाव घेतली आणि स्ट्राईक भुवनेश्वर कुमारला मिळाली. सामना जिंकण्यासाठी त्याला षटकार मारायचा होता, मात्र वरुणने त्याला एकही धाव काढू दिली नाही आणि संघाला विजय मिळवून दिला. वरुणने चार षटकांमध्ये २० धावा देऊन एक बळी मिळवला. त्यालाच सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

१७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मयंक अग्रवाल आणि अभिषेक शर्मा यांनी हैदराबादच्या डावाला सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी २९ धावांची भागीदारी केली, पण मयंक ११ चेंडूंत १८ धावा करून बाद झाला. पुढच्याच षटकात अभिषेक शर्मा नऊ धावा काढून बाद झाला. हैदराबादने ५४ धावांच्या स्कोअरवर आपले आघाडीचे चार फलंदाज गमावले, पण एडन मार्कराम आणि हेनरिक क्लासेन यांनी पाचव्या विकेटसाठी ७० धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. २० चेंडूंत ३६ धावा करणाऱ्या क्लासेनला शार्दुल ठाकूरने बाद केले, तर मार्कराम ४० चेंडूंत ४१ धावा करून बाद झाला.

तत्पूर्वी, कोलकाताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कोलकाताकडून रिंकू सिंगने ४६ आणि नितीश राणाने ४२ धावा केल्या. या दोघांशिवाय आंद्रे रसेलने २४ आणि जेसन रॉयने २० धावा केल्या. हैदराबादकडून टी. नटराजन आणि मार्को जॅनसेन यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले, तर भुवनेश्वर कुमार, कार्तिक त्यागी, मयंक मार्कंडे आणि एडन मार्कराम यांना प्रत्येकी एक गडी बाद करण्यात यश मिळाले.

विजयासोबतच कोलकाताने प्ले ऑफमध्ये पोहचण्याचे आव्हान कायम ठेवले. हा संघ गुणतालिकेत आठव्या स्थानी आहे, तर पराभवामुळे हैदराबादची प्ले ऑफमध्ये जाण्याची वाट बिकट झाली आहे. हा संघ सहा गुणांसह नवव्या स्थानी गेला आहे.

# आंद्रे रसेलचे टी-२० क्रिकेटमध्ये ६०० षटकार

**मुंबई : प्रतिनिधी**



कोलकाता नाईट रायडर्सचा स्फोटक फलंदाज आंद्रे रसेलने सनरायझर्स हैद्राबादविरुद्ध झालेल्या सामन्यात १५ चेंडूंत २४ धावांची खेळी केली. या डावात रसेलने दोन षटकार आणि चौकार मारला. यासोबतच त्याने टी-२० क्रिकेटमध्ये ६०० षटकार ठोकण्याची चमकदार कामगिरी केली आहे.

रसेल आता सर्वांत जास्त षटकार ठोकणाऱ्यांच्या यादीत तिसऱ्या स्थानावर पोहचला आहे. या यादीत ख्रिस गेल अग्रस्थानी आहे. गेलने टी-२० क्रिकेटमध्ये एक हजारहून अधिक षटकार ठोकले आहेत. गेलच्या नावावर १०५६ षटकार ठोकण्याचा विक्रम आहे. दुसऱ्या क्रमांकावर किएरॉन पोलार्ड आहे. पोलार्डने ८१३ षटकार मारण्याची कामगिरी केली आहे.

सर्वाधिक षटकार ठोकण्याच्या यादीत टॉप ३मध्ये तिन्ही फलंदाज वेस्ट इंडिजचे आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, क्रिकेटविश्वात तुफानी फलंदाजी करण्यात कॅरेबियन खेळाडूंचा दबदबा आहे. टी-२० क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वांत जास्त षटकार ठोकण्याचा विक्रम रोहित शर्माच्या नावावर आहे. रोहितने टी-२० क्रिकेटमध्ये ४७२ षटकार ठोकले आहेत.

याशिवाय आयपीएलमध्ये सर्वांत जास्त षटकार ठोकण्याचा विक्रमही ख्रिस गेलच्या नावावर आहे. गेलने आयपीएलमध्ये ३५७ षटकार मारले आहेत. त्या खालोखाल डिव्हिलियर्सने २५१ आणि रोहितने २५० षटकार आयपीएल सामन्यांमध्ये ठोकले आहेत, तर रसेलने आयपीएलमध्ये आतापर्यंत १८८ षटकार ठोकले आहेत.

# मुंबईत १४ वर्षांखालील मुला-मुलींची कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या वतीने १४ वर्षांखालील मुला-मुलींकरिता प्रायोगिक तत्त्वावरील कबड्डी स्पर्धा १० ते १५ मे या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. वरळी गावातील गोलफादेवी सेवा मंडळाच्या सहकार्याने ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या संघातील खेळाडूंचे वजन ४५ किलोच्या आत आणि जन्मतारीख १ मे २००९ किंवा त्यानंतरची असावी. जन्मतारखेची सत्यता पडताळण्याकरिता प्रत्येक खेळाडूंनी आधार कार्डची सत्यप्रत व जन्मतारखेचा दाखल किंवा शाळेचे ओळखपत्र सोबत आणणे गरजेचे आहे. अशा प्रकारे फाईल तयार करून ती मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या कार्यालयात ८ मेपर्यंत जमा करणे गरजेचे आहे.

शालेय स्तरावरील मुला-मुलींना प्रोत्साहन देण्याकरिता या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. संघटनेला संलग्न असलेल्या जास्तीत जास्त संघांनी या स्पर्धेत सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे सचिव विश्वास मोरे यांनी केले आहे.

# डब्ल्यूटीसी फायनललाही राहुल मुकणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार लोकेश राहुल आयपीएलमधून बाहेर झाल्यानंतर आता जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम सामन्यालादेखील मुकणार आहे. राहुलने पोस्ट लिहून याबाबत माहिती दिली.



राहुलने पोस्टमध्ये म्हटले, काळजीपूर्वक विचार केल्यानंतर आणि वैद्यकीय टीमशी सल्लामसलत केल्यानंतर असे समोर आले की, माझ्या मांडीवर लवकरच शस्त्रक्रिया केली जाईल. त्यामुळे आगामी काही दिवस मला विश्रांतीची गरज आहे. हा निर्णय घेणे खरोखर कठीण आहे, परंतु मला माहिती आहे की ठीक होण्यासाठी हा निर्णय योग्य आहे.

लखनौ सुपर जायंट्स संघाचा कर्णधार या नात्याने या वेळी संघासोबत नसल्याने खूप वेदना होत आहेत, पण मला खात्री आहे की, माझ्या संघातील शिलेदार या प्रसंगाला सामोरे जातील आणि नेहमीप्रमाणे त्यांची सर्वोत्तम कामगिरी करतील. मी पुढच्या महिन्यात भारतीय संघासोबत ओव्हलवर नसणार हे पूर्णपणे निराशाजनक आहे. ब्ल्यू जर्सीत पुनरागमन करण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करेन, असेही राहुलने म्हटले.

राहुलने बीसीसीआयचे आभार मानताना म्हटले की, मला सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करायची आहे, ज्यांनी मला परत येण्याचे बळ दिले. लखनौच्या संघाचे व्यवस्थापन आणि बीसीसीआयच्या तत्परतेबद्दल तसेच पाठिंब्याबद्दल सर्वांचे आभार. मी लवकरच मैदानात परत येण्याची आशा करतो. मी नेहमीप्रमाणेच देशासाठी माझे सर्व काही देईन. समर्थन आणि शुभेच्छांसाठी धन्यवाद!

# जॉंटी ऱ्होड्सच्या कृतीने मने जिंकली!

**लखनऊ : वृत्तसंस्था**



चेन्नई सुपर किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यातील सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. लखनऊच्या एकना स्टेडियमवर दोन्ही संघ आमनेसामने होते, मात्र पावसामुळे सामना पूर्ण होऊ शकला नाही. दोन्ही संघांना १-१ गुणांवर समाधान मानावे लागले. या सामन्यादरम्यान लखनऊ सुपर जायंट्सचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक जॉंटी ऱ्होड्स यांनी केलेल्या कृतीने सर्वांनी मने जिंकली आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना लखनऊ सुपर जायंट्स संघाने १९.२ षटकांत सात विकेट्स गमावत १२५ धावा केल्या होत्या, मात्र त्यानंतर पावसामुळे सामना थांबवावा लागला. वास्तविक, पावसामुळे खेळ थांबला होता, त्या वेळी लखनऊचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक जॉंटी ऱ्होड्स मैदानावरील कव्हर आणण्यासाठी ग्राउंड स्टाफला मदत केली. पाऊस पडत असताना मैदानावर लवकर आवरण आणण्यासाठी ते ग्राउंड स्टाफला मदत करीत होते. सोशल मीडियावर हा व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

# कोहली-गंभीरला युवराज सिंगकडून शांत राहण्याचा सल्ला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्यात झालेल्या वादविवादानंतर माजी दिग्गज क्रिकेटर्स प्रतिक्रिया देऊ लागले आहेत. सुनील गावसकर आणि वीरेंद्र सेहवाग या दोघांनीही त्यांना फटकारले आहे. अशातच आता भारताचा माजी स्टार फलंदाज युवराज सिंगने कोहली-गौतमच्या भांडणात उडी घेतली आहे.

युवराजने एक ट्वीट करीत दोघांनाही सल्ला दिला आहे. मजेशीर अंदाजात युवराजने ट्वीटमध्ये म्हटलंय, स्प्राईटने त्यांच्या कॅम्पेनमध्ये 'ठंड रख' या टॅगलाईनसाठी गौती आणि चीकूला साईन केले पाहिजे. मित्रांनो तुम्हाला काय वाटते? अशा प्रकारे युवराजने या ट्वीटच्या माध्यमातून दोघांनाही शांत राहण्याचा आवाहन केले आहे. युवराजच्या या ट्वीटवर चाहत्यांनी भन्नाट प्रतिक्रियांचा वर्षाव केला आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि लखनऊ सुपर जायंट्सचा मार्गदर्शक गौतम गंभीर हे दोघे सोमवारी झालेल्या सामन्यानंतर एकमेकांसोबत भिडले. बंगळुरूने या सामन्यात लखनऊचा १८ धावांनी पराभव केला होता. या दोघांनाही आयपीएलच्या आचारसंहितेच्या अनुच्छेद २.२१चे उल्लंघन केल्यामुळे सामन्याचे १०० टक्के शुल्क भरण्याचा दंड ठोठावण्यात आला.

# वरुण चक्रवर्तीने सांगितले खास कामगिरीमागचे गुपित

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुरुवारी कोलकाता नाईटरायडर्सने रोमांचक सामन्यात सनरायझर्स हैदराबादला पाच धावांनी पराभूत केले. या सामन्यात शेवटच्या षटकात हैदराबादला केवळ नऊ धावांची गरज होती, मात्र कोलकाताचा फिरकीपटू वरुण चक्रवर्तीने हैदराबादच्या फलंदाजांना फिरकीच्या जाळ्यात गुंतवून संघाला विजय मिळवून दिला. या विजयानंतर वरुणने आपल्या जादुई कामगिरीमागचे गुपित सांगितले आहे.



वरुण चक्रवर्तीने सांगितले की, शेवटच्या षटकामध्ये माझ्या हृदयाचे ठोके २००पर्यंत वाढले होते. फलंदाजाने मैदानातील लांब भागात फटके खेळावेत, असे माझे नियोजन होते. चेंडू हातातून सुटत होता. अशा परिस्थितीत माझा सर्वांत चांगला डाव लाँग साईड होता तसेच तीच माझी एकमेव आशा होती. मी माझ्या पहिल्या षटकामध्ये १२ धावा दिल्या होत्या. मार्करामने त्या षटकात दोन चौकार ठोकले होते. गतवर्षी मी ८५ किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी करीत होतो. मी अनेक गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. नंतर मला आपल्या रेव्होल्युशनवर काम करण्याची गरज आहे, असे मला वाटले. मी त्याच्यावर काम केले.






### न्यूझीलंड-एशिया कप इनडोअर क्रिकेट स्पर्धा

# भारताचा श्रीलंकेवर विजय; एरिसची अष्टपैलू कामगिरी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड-एशिया कप इनडोअर क्रिकेट स्पर्धेत खुल्या गटात भारताने श्रीलंकेवर ७४-४३ असा ३१ धावांनी दणदणीत विजय साजरा केला. सातपैकी सहा गुण मिळवत भारताने गुणतालिकेत दुसरे स्थान कायम राखले आहे. या सामन्यात भारताच्या एरिसने अष्टपैलू खेळ करताना १६ धावा करताना चार वेळा श्रीलंकन खेळाडूंना बाद करण्यात यश मिळवले, तर दैविक (१५ धावा व दोन बळी), धनुश (१५ धावा) व सूरज (चार धावा व तीन बळी) यांनी एरिसरला चांगली साथ दिली.



श्रीलंकेकडून शेवोन फोनेस्क (११ धावा व तीन बळी), कोलिथा (२० धावा व एक बळी) व रूमन परेरा (१२ धावा) यांनाच चांगली कामगिरी करता आली. भारताच्या धनुश व दैविक या पहिल्या जोडीने चार षटकांत ३१ धावा केल्या. विजय व अफरोज या दुसऱ्या जोडीने २१ धावा जोडल्या. भारताच्या नमशिद व गिरीश या तिसऱ्या जोडीने निराशजनक कामगिरी केल्याने या षटकात फक्त दोन धावाच धावफलकावर लागल्या. त्यानंतर सूरज व एरिस या चौथ्या जोडीने २० धावा करीत एकूण ७४ धावा फलकावर लावण्यात यश मिळविले.

श्रीलंकेच्या शेवोन फोनेस्क व एंडी सायमन या पहिल्या जोडीला ११ धावा करता आल्या. भारतीयांनी तीनवेळा या खेळाडूंना बाद केले. रूमन परेरा व कमाल कुरुप्पू या दुसऱ्या जोडीने २१ धावा केल्या. चामिंडा व ईसुरू या जोडीने वजा १७ धावा केल्या (या जोडीवेळी भारतीयांनी सहा वेळा फलंदाजांना बाद केले. प्रत्येक बादला पाच धावा वजा होतात), तर शेवटच्या कोलिथा व दिलसारा या जोडीने जोरदार फलंदाजी करीत २८ धावा चोपून काढल्या.

या सामन्यात भारताने विजयाचे तीन व चारपैकी तीन जोडीचे (जास्त धावा) तीन असे सातपैकी सहा गुण वसूल केले, तर शेवटच्या जोडीच्या धावफरकचा एक गुण श्रीलंकेने मिळवला. इनडोअर क्रिकेटमध्ये प्रत्येक जोडीला चार षटके फलंदाजी करावी लागते तर प्रत्येक खेळाडूला (विकेटकिपरसहित) दोन षटके गोलंदाजी करावी लागते.

जागतिक इनडोअर क्रिकेट महासंघाच्या मान्यतेने इंडियन इनडोअर स्पोर्ट्स फाउंडेशनने बंगळुरूमध्ये न्यूझीलंड-एशिया कप इनडोअर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत यजमान भारतासह न्यूझीलंड, श्रीलंका, युएई व सिंगापूर हे देश सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत खुला गट व मास्टर्स (४०+) गटाचे संघ समाविष्ट आहेत.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com